


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २५५ * नांदेड * गुरूवार, दि. २४ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## दोन दिवसांत दुष्काळाचा जीआर; लातूरमध्ये मुख्यमंत्र्यांची घोषणा

### मुख्यमंत्र्यांनी केली पिक परिस्थितीची पाहणी

**लातूर (प्रतिनिधी)–** मराठवाड्यात प्रचंड मोठा दुष्काळ पडला आहे. १९७२ ला झाला होता तसा दुष्काळ झाला आहे. खूप मोठं नुकसान झालं आहे. पण तुम्ही चिंता करू नका. सरकार तुमच्या पाठिशी आहे. येत्या दोन दिवसांत आम्ही दुष्काळाचा जीआर काढणार आहोत. दुष्काळासाठीची सर्व मदत करणार आहोत. रब्बी पिकं घेता आली तर त्यासाठीही मदत करणार आहोत, असं सांगतानाच तुमचं सरसकट नुकसान झाल्याने आम्ही तुम्हाला सरसकट मदत करणार आहोत, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

पीक परिस्थितीच्या पाहणीसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्याला लातूर येथून सुरुवात झाली. यावेळी त्यांनी लातूर जिल्ह्यातील जाऊ आणि खरोसा येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन खरीप पिकांच्या नुकसानीची पाहणी केली व शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. या प्रसंगी लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार बसवराज पाटील, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

राज्यात यंदा दुष्काळाची भीषणता १९७२ पेक्षाही अधिक तीव्र राहण्याची शक्यता आहे. या बाबीचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य शासनाने गतीने पावले उचलली आहेत. लवकरच दुष्काळाबाबतची अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल. संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट मदत जमा करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. शेतकऱ्यांचे सुमारे ४८ हजार कोटी



रुपयांचे कृषिपंप वीज बिल यापूर्वीच माफ केले असून, यापुढेही त्यांना वीज बिल भरावे लागणार नाही. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना राबवून शेतकऱ्यांना शासनाने दिलासा दिला असून, या योजनेचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्याला मिळेपर्यंत तिची अंमलबजावणी सुरूच राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## नांदेड जिल्ह्याला पुढील तीन दिवस 'येलो अलर्ट'

### वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि. २४ ते २६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. या कालावधीत जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असून, नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

दि. २४ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्याची तसेच विजांच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. दि. २५ सप्टेंबर रोजी तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वादळी वारे, विजांचा कडकडाट व ढगांचा गडगडाट यासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे. दि. २६ सप्टेंबर रोजी भूपृष्ठाजवळून अचानक ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वादळी किंवा वेगवान वारे वाहण्याची तसेच हलका पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## इतवारा ठाण्याचे प्रभारी खनाळ नियंत्रण कक्षात; कैलासे यांच्याकडे जबाबदारी

**नांदेड (प्रतिनिधी)–** गणपती विसर्जनाला अवघे दोन दिवस शिल्लक असताना नांदेड पोलीस दलात महत्त्वाचा प्रशासकीय बदल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन यांच्या आदेशानुसार इतवारा ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ यांची उचलबांगडी करून त्यांची नियुक्ती नियंत्रण कक्षात करण्यात आली आहे. त्यांच्या जागी द्वितीय पोलीस निरीक्षक सिद्धेश्वर कैलासे यांच्याकडे प्रभारी अधिकारीपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या अचानक बदलामुळे पोलीस वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. काही दिवसांपूर्वीच डीआयजी शहाजी उमाप यांच्या पथकाने इतवारा हद्दीत कारवाई करत मोठ्या प्रमाणावर गुटखा जप्त केला होता. या कारवाईनंतर इतवारा पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीबाबत विविध चर्चा सुरू झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षकांनी २२ सप्टेंबर रोजी हा प्रशासकीय बदल केला आहे. जरी या कारवाईचा गुटखा प्रकरणाशी थेट संबंध आहे का, याबाबत अधिकृत माहिती समोर आली नसली तरी, वेळेवरून तर्कवितर्क लावले जात आहेत.

दरम्यान, खनाळ हे जानेवारी २०२७ मध्ये सेवानिवृत्त होणार असल्याची माहिती आहे. सेवाकाळाच्या अखेरच्या टप्प्यात झालेल्या या बदलीची पोलीस दलात विशेष चर्चा होत आहे.

## प्रतिकात्मक स्वरुपात गणेश विसर्जन करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

### प्रतिसाद देणाऱ्या गणेश मंडळांचा प्रशासनाकडून होणार सन्मान

**नांदेड (प्रतिनिधी)–** यंदा राज्यात उद्भवलेली तीव्र दुष्काळी परिस्थिती आणि श्री गणेश विसर्जनाच्या दिवशी वर्तवण्यात आलेला वादळी पावसाचा इशारा लक्षात घेता प्रशासनाने गणेशभक्तांना यंदा प्रतिकात्मक स्वरुपात श्री गणेश विसर्जन करण्याचे आवाहन केले आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांसह विसर्जन स्थळांची पाहणी केल्यानंतर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.

यंदा पाऊस अत्यंत कमी झाल्यामुळे श्री गणेश विसर्जनासाठी नदी–तलावांमध्ये पर्याप्त पाणी उपलब्ध नाही. अनेक गणेश मंडळांची श्री गणेशाची मुर्ती २० फुटांपेक्षा जास्त उंचीच्या असून अशा मोठ्या श्री गणेश मुर्तीचे विसर्जन करणे सध्याच्या परिस्थितीत अशक्य झाले आहे. त्यातच विसर्जनाच्या दिवशी वादळी पावसाची दाट शक्यता असल्याने सुरक्षेचा मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो. हीच गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने गणेश भक्तांना यंदा मोठ्या श्री गणेश मूर्तींचे विसर्जन न करता प्रतिकात्मक विसर्जन करून सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जे गणेशोत्सव मंडळ प्रशासनाच्या या आवाहनाला मान देऊन प्रतिकात्मक विसर्जन करणाऱ्या श्री गणेश मंडळाचा समाजासमोर एक चांगला आणि आदर्श पायंडा ठेवल्याबद्दल प्रशासनाच्यावतीने विशेष सत्कार केला जाईल, असे स्पष्ट केले.

आम्ही विसर्जनाची पर्यायी सोय करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहोत, परंतु निसर्गाच्या मर्यादांमुळे काही अडचणी आहेत, असे सांगत जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व गणेशभक्तांना आणि कार्यकर्त्यांना सुरक्षेचा उपाय म्हणून प्रशासनाला भरभरून साथ देण्याचे आवाहन केले केले आहे. या संकटकाळात नियम पाळून उत्सव साजरा करणे हीच खरी बाप्पाची सेवा ठरेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## ई–पिक पाहणीत चुकीच्या पद्धतीने नोंद, कर्मचाऱ्यावर गुन्हा

### कंधार तालुक्यातील सोमठाणा येथील प्रकरण; जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** कंधार तालुक्यातील सोमठाणा येथे ई–पिक पाहणी प्रक्रियेत चुकीच्या पद्धतीने पीक पाहणीची नोंद करून फोटो अपलोड केल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी संबंधित ई–पिक पाहणी सहाय्यक विजय गीते यांच्याविरुद्ध नियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, आवश्यक कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

ई–पिक पाहणी प्रक्रियेअंतर्गत प्रत्यक्ष शेतातील पिकांची पाहणी करून त्याची छायाचित्रे व आवश्यक माहिती प्रणालीवर अपलोड करणे अपेक्षित आहे. सोमठाणा येथे संबंधित ई–पिक पाहणी सहाय्यकाने पीआयपी (फोटोवरून फोटो काढून) ई–पिक पाहणीसाठी छायाचित्रे अपलोड केल्याचे तपासणीत आढळून आले.

या प्रकाराची तपासणी करण्यात आल्यानंतर ई–पिक पाहणीची नोंद चुकीच्या पद्धतीने करून शासनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाल्याचे निदर्शनास आले. या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार तहसीलदार, कंधार यांनी ग्राम महसूल अधिकाऱ्यामार्फत संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही केली आहे.

ई–पिक पाहणी प्रक्रियेत अनियमितता अथवा चुकीच्या पद्धतीने नोंदी करून शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## नांदेड तालुक्यातील ५४ ग्रामपंचायतींचे सुधारित सरपंच आरक्षण जाहीर; विष्णुपुरी, लिंबगावात खुला प्रवर्ग

**नांदेड (प्रतिनिधी)–** तालुक्यातील ५४ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे सुधारित आरक्षण अखेर जाहीर झाले आहे. तहसीलदार स्वप्निल दिग्गलवाड यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दि. २२ सप्टेंबर तहसील कार्यालयात उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ यांच्या उपस्थितीत ही सोडत काढण्यात आली. आरक्षण जाहीर होताच तालुक्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे.

राजकीयदृष्ट्या संवेदनशील समजल्या जाणाऱ्या विष्णुपुरी, लिंबगाव, खुर्गाव, गंगाबेट आणि ब्राह्मणवाडा येथे सरपंच पद खुल्या प्रवर्गासाठी सुटल्याने येथे चुरशीची लढत होणार आहे. तर वाडी, खडकूत, कासारखेडा आणि आलेगाव येथे नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) आरक्षण सुटल्याने वर्षानुवर्षे सत्ता भोगणाऱ्या प्रस्थापितांना धक्का बसला आहे. त्यामुळे अनेकांनी आपल्या घरातील सदस्यांना किंवा समर्थकांना पुढे करण्याची मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

**खुला प्रवर्ग (१८ गावे) :** विष्णुपुरी, लिंबगाव, ब्राह्मणवाडा, गंगाबेट, तळणी, एकदरा, पासदगाव, पासदगाव तर्फे काकांडी, भायेगाव, खुर्गाव, चिखली (खु), दर्यापूर, गुंडेगाव, नांदुसा/भालकी, इंजेगाव, चिमेगाव, पिंपळगाव मिस्री, सुगाव (खु).

**खुला प्रवर्ग महिला (१९ गावे) :** बोंढार तर्फे नेरली, तुप्पा, पुणेगाव, सोमेश्वर, **(पान ३ वर...)**

## अर्धापूर तालुक्यातील संतप्त शेतकऱ्याने केली सोयाबीन पिकाची होळी

### नुकसानभरपाईसह मदत देण्याची शासनाकडे मागणी

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** हातातोंडाशी आलेला घास निसर्गाच्या अवकृपेमुळे व नापिकीमुळे हिरावून गेल्याने अर्धापूर तालुक्यातील दाभड येथील शेतकरी वैजनाथ सूर्यवंशी यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. शेतातील वाया गेलेले सोयाबीनचे पीक एकत्र करून त्यांनी ते शेतातच पेटवून देत दुष्काळ जाहीर करून एकरी ५० हजारांची मागणी केली आहे.


या वर्षी सोयाबीनला शेंगा लागल्या, परंतु हवामानाच्या प्रतिकूलतेमुळे शेंगांमध्ये दाणे भरलेच



नाहीत. शेंगा वाळून पापडी झाल्या असून पिकाची पाने पूर्णपणे कोमेजून गेली आहेत. डोळ्यांदेखत संपूर्ण पीक उद्ध्वस्त झाल्याचे पाहून हतबल झालेल्या सूर्यवंशी यांनी कापणी केलेले सोयाबीन शेतातच जाळून आपले नुकसान व विरोध दर्शवला.

यावेळी त्यांनी बाधित शेतकऱ्यांना प्रतिएकरी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत मिळावी आणि भागातील गंभीर परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाने तातडीने मदत जाहीर करावी, अशी मागणी केली.

शेतकरी वैजनाथ सूर्यवंशी म्हणाले की, वर्षभराची मेहनत आणि लावलेला भांडवली खर्च वाया गेल्याने भविष्यात कुटुंबाचा गाडा कसा चालवायचा, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. आमचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, मायबाप शासनानेच आता पुढाकार घेऊन आम्हा सर्व शेतकऱ्यांना या भीषण संकटातून बाहेर काढण्यासाठी तातडीने पंचनामे करून मदत करावी, असे ते म्हणाले.




## 'मास रेड' मोहीम; एका दिवसात ३६ गुन्हे दाखल, २६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** दि. २२ सप्टेंबर रोजी जिल्हाभर विशेष 'मास रेड' मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत ३६ गुन्हे दाखल करून २६ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या मोहिमेत जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांनी एकाच वेळी शहरी आणि ग्रामीण भागातील संशयित ठिकाणांवर छापे टाकून कारवाई केली. या एका दिवसाच्या कारवाईत मटका, जुगार, दारूबंदी, गुटखा आणि अवैध वाळू प्रकरणात एकूण ३६ गुन्हे दाखल करून ५४ आरोपींवर कारवाई करण्यात आली असून २६ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कारवाईत २६ लाख १२ हजार २३४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



ही मोहीम अपर पोलीस अधीक्षक आणि सर्व उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांनी पार पाडली. अवैध व्यवसायांबाबत माहिती असल्यास नागरिकांनी स्थानिक पोलीस ठाण्याला किंवा डायल ११२ वर संपर्क साधून सहकार्य करावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# सीमेवर शांतता, संबंधांत स्थैर्य

भारत आणि चीन हे आशियातील दोन महत्त्वाचे देश. दोन्ही देशांची लोकसंख्या प्रचंड, अर्थव्यवस्था वेगाने विस्तारत असलेल्या आणि जागतिक राजकारणावर प्रभाव टाकण्याची क्षमता असलेली. त्यामुळे भारत–चीन संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला की, त्याचे परिणाम केवळ द्विपक्षीय संबंधांपुरते मर्यादित राहत नाहीत; त्याचा परिणाम संपूर्ण आशियाच्या स्थैर्यावर आणि जागतिक अर्थव्यवस्थेवरही होतो. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी झालेल्या चर्चेत 'सीमेवर शांतता आणि स्थैर्य हीच द्विपक्षीय संबंध सुधारण्याची पूर्वअट आहे' हे स्पष्ट करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर झालेल्या मोदी–जिनपिंग चर्चेत दोन्ही नेत्यांनी भारत–चीन संबंधांचा आढावा घेतला. मतभेदांचे रूपांतर संघर्षात होऊ नये, सीमा व्यवस्थापनाशी संबंधित करारांचे काटेकोर पालन व्हावे आणि सीमा प्रश्नावर दोन्ही देशांना मान्य होईल असा तोडगा शोधण्याचे प्रयत्न सुरू ठेवावेत, यावर भर देण्यात आला. ही भाषा मुत्सद्देगिरीची असली तरी तिच्यामागे २०२० मधील गलवान खोऱ्यातील संघर्षाची कटू पार्श्वभूमी आहे, हे विसरून चालणार नाही. गलवाननंतर भारताने चीनकडे केवळ शब्दांवर विश्वास ठेवण्याऐवजी प्रत्यक्ष कृतीची अपेक्षा केली आहे. सीमावर्ती भागातील शांतता ही केवळ सैनिकांमधील संघर्ष टाळण्यापुरती बाब नाही. ती विश्वास निर्माण करण्याची पहिली पायरी आहे. सीमा शांत नसेल तर राजकीय संवाद, आर्थिक सहकार्य आणि व्यापारवाढ यांना अपेक्षित गती मिळू शकत नाही. त्यामुळे चीनने सीमा व्यवस्थापनासंदर्भातील करारांचे प्रामाणिकपणे पालन करणे ही भारताची रास्त अपेक्षा आहे. दोन्ही देशांमधील आणखी एक गंभीर प्रश्न म्हणजे व्यापारातील असमतोल. भारत–चीन व्यापार मोठ्या प्रमाणावर असला तरी आयातीच्या तुलनेत भारताची निर्यात कमी आहे. यामुळे भारताची चीनवरील आर्थिक अवलंबित्वाची चिंता वाढते. पुरवठा साखळीच्या बाबतीतही भारताला अधिक आत्मनिर्भरता आणि विविधीकरणाची गरज आहे. चीनशी आर्थिक संबंध तोडणे हा व्यवहार्य पर्याय नाही; परंतु व्यापारातील समतोल, बाजारपेठेतील न्याय्य प्रवेश आणि विश्वासार्ह पुरवठा साखळी निर्माण करणे गरजेचे आहे. चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांचा सात वर्षांनंतरचा भारत दौरा हीदेखील प्रतीकात्मकदृष्ट्या महत्त्वाची घटना आहे. २०२० नंतर दोन्ही देशांमध्ये निर्माण झालेला अविश्वास कमी करण्यासाठी उच्चस्तरीय संवाद वाढणे आवश्यक आहे. मात्र संवाद म्हणजे मतभेद विसरणे नव्हे. मुत्सद्देगिरीत मैत्रीचे हात पुढे करतानाच राष्ट्रीय हिताचे संरक्षण करण्याची क्षमता दाखवावी लागते. भारताने याच संतुलित भूमिकेचा अवलंब करणे अपेक्षित आहे. ब्रिक्सच्या व्यासपीठावर पश्चिम आशियातील संघर्षाबाबत जिनपिंग यांनी व्यक्त केलेली चिंता आणि शांततेसाठी ब्रिक्स देशांनी भूमिका बजावावी, हा मुद्दाही महत्त्वाचा आहे. आज जग अनेक संघर्षांनी ग्रस्त आहे. युक्रेनपासून पश्चिम आशियापर्यंत युद्धाचे परिणाम ऊर्जा, व्यापार, अन्नसुरक्षा आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर होत आहेत. अशा परिस्थितीत ब्रिक्ससारख्या बहुपक्षीय व्यासपीठाची भूमिका केवळ आर्थिक सहकार्यापुरती मर्यादित राहू नये. संघर्ष टाळणे, संवाद वाढवणे आणि विकसनशील देशांच्या हितांचे प्रतिनिधित्व करणे यासाठीही या समूहाने प्रभावी भूमिका बजावली पाहिजे. मात्र भारताने चीनच्या प्रत्येक भूमिकेकडे संशयाने पाहावे किंवा प्रत्येक प्रस्तावाला विरोध करावा, अशीही भूमिका योग्य नाही. परंतु त्याच्यावर पूर्णपणे विश्वास टाकने हेही बरोबर नाही. म्हणूनच केवळ शिखर बैठका, छायाचित्रे आणि मैत्रीपूर्ण निवेदने यांना संबंध सुधारल्याचे प्रमाणपत्र मानणेही धोकादायक ठरेल. सीमेवर प्रत्यक्ष शांतता, करारांचे पालन, सैनिकांमधील विश्वास, व्यापारातील समतोल आणि संवेदनशील क्षेत्रांमध्ये पारदर्शकता, यातूनच संबंध सुधारल्याचे सिद्ध होईल. भारत आणि चीन यांच्यात स्पर्धा आहे, मतभेद आहेत आणि सीमावादही आहे; पण संघर्ष हा कोणाच्याही हिताचा नाही. भारताला विकासासाठी शांत सीमांची गरज आहे आणि चीनलाही आशियातील स्थैर्याची आवश्यकता आहे. त्यामुळे दोन्ही देशांनी 'स्पर्धा असली तरी संघर्ष नको' या सूत्रावर पुढे जाणे काळाची गरज आहे. सीमेवर बंदुका शांत असतील तरच संवादाचे दरवाजे उघडे राहतील, आणि संवाद टिकला तरच मतभेदांवर तोडगा शोधण्याची शक्यता निर्माण होईल. भारत–चीन संबंधांचे भविष्य घोषणांमध्ये नाही, तर सीमेवरील प्रत्यक्ष शांततेत आणि परस्पर विश्वासाच्या कृतीत दडलेले आहे.

# सुख-सुविधांच्या काळात हरवत चाललेले आरोग्य



आजचा माणूस सुख–सुविधांनी समृद्ध झाला आहे; पण आरोग्याच्या बाबतीत मात्र तो दिवसेंदिवस दरिद्री होत चालला आहे. विज्ञानाने जीवन अधिक सोपे केले, श्रम कमी केले, वेळ वाचवला आणि हाताशी सुख–सोयींची असंख्य साधने आणून ठेवली. मात्र वाचवलेला वेळ शरीरासाठी वापरण्याऐवजी मोबाईल, टीव्ही आणि विविध प्रकारच्या मनोरंजनाच्या हवाली केला जात आहे. रोगांवर उपचार करण्यासाठी नवनवीन औषधे आणि तंत्रज्ञान विकसित होत आहे; परंतु रोगांना आमंत्रण देणारी आपली जीवनशैली बदलण्याची तयारी मात्र कमी होत चालली आहे. सुख–सुविधा वाढल्या, पण शरीरातील स्फुर्ती, चपळता आणि सहनशक्ती कमी होत गेली. निरोगी शरीरासाठी श्रम, संयम, संतुलित आहार आणि शिस्तबद्ध दिनचर्या आवश्यक असते. पूर्वी पायी चालणे हा जीवनाचा सहज आणि स्वाभाविक भाग होता. आज मात्र थोड्याशा अंतरासाठीही वाहनाची गरज भासते आणि दोन मजले चढायचे म्हटले तरी लिफ्ट शोधली जाते. एकेकाळी प्रवासाचे साधन आणि व्यायामाचे माध्यम असलेली सायकल आज अनेक घरांच्या कोपऱ्यात धूळ खात पडलेली दिसते; काही घरांतून तर ती पूर्णपणे हद्दपार झाली आहे.

शरीराला श्रम मिळाले नाहीत, तर त्याची शक्ती क्षीण होणारच. शेतात नांगर चालला नाही, तर जमीन हळूहळू पडीक पडते; त्याचप्रमाणे शरीराला हालचाल मिळाली नाही, तर त्यातही जडत्व निर्माण होते. दिवसभर खुर्चीवर बसून राहणे, घरी आल्यानंतर सोफ्यावर अंग टाकणे आणि त्यानंतर तासन्तास मोबाईलमध्ये बुडून जाणे, ही आज अनेकांची नेहमीची दिनचर्या बनली आहे. 'व्यायामासाठी वेळ नाही,' अशी तक्रार करणाऱ्या माणसाकडे स्क्रीनसमोर तासन्तास बसण्यासाठी मात्र वेळ असतो. योग, प्राणायाम आणि ध्यान यांसारख्या आरोग्यदायी साधनांकडेही काही ठिकाणी अंतर्मुख होण्याचे माध्यम म्हणून नव्हे, तर प्रदर्शनाचा भाग म्हणून पाहिले जात आहे. शरीर आणि मनासाठी आवश्यक असलेली शिस्त केवळ बोलण्यात राहून उपयोग नाही; ती प्रत्यक्ष जीवनात उतरवावी लागते.

झोपेच्या बाबतीतही आधुनिक माणूस आपल्या शरीराशी अन्याय करत आहे. रात्री उशिरापर्यंत मोबाईलच्या पडद्यावर डोळे खिळवून ठेवायचे आणि सकाळी उशिरापर्यंत अंथरुणात पडून राहायचे, अशी विस्कळीत दिनचर्या अनेकांच्या जीवनाचा भाग बनली आहे. रात्री डोळे मोबाईल शोधतात आणि सकाळी डोळे उघडताच हात पुन्हा मोबाईलकडे जातो. शरीर विश्रांतीची मागणी करत असते; पण मन सतत नव्या मनोरंजनाच्या शोधात असते. अशा परिस्थितीत दिवसभर थकवा, चिडचिड आणि अस्वस्थता जाणवत राहिली, तर त्यात नवल ते काय? आहार–विहारातील बदल तर आणखी चिंताजनक आहेत. माणूस आपल्या जिभेच्या चोचल्यांच्या इतका आहारी गेला आहे की भूक मागे पडली आणि चव पुढे आली. मीठ, मिरची, मसाले, तेल, तूप आणि साखरेचा भरमसाठ वापर करून पदार्थ इतके चटपटीत केले जातात की साधे, घरगुती जेवणही आता अनेकांना बेचव वाटू लागले आहे. जिभेला प्रत्येक वेळी नवी चव हवी असते आणि त्या चवीचा सगळा भार बिचारे पोट वाहत राहते.

बुफे संस्कृतीने या प्रवृत्तीला आणखी खतपाणी घातले आहे. समोर पदार्थांची लांबलचक रांग दिसली की गरज मागे पडते आणि हव्यास पुढे येतो. जितके खायचे आहे त्यापेक्षा अधिक पदार्थ ताटात वाढून घेतले जातात. भोजन ही शरीराची गरज न राहता जणू चवीची स्पर्धाच बनते. ताट भरले जाते; पण शरीराला खरोखर काय हवे आहे, याचा विचार मात्र मागे पडतो. आपल्या ताटाचे स्वरूपही बदलत चालले आहे. पालेभाज्या, इतर भाज्या, डाळी, कडधान्ये, कोशिंबीर, फळे आणि संपूर्ण धान्य यांचे प्रमाण कमी होत आहे; तर मैदा, तळलेले पदार्थ, मीठ आणि साखरेचे प्रमाण वाढत आहे. तंतुमय पदार्थ हे आहाराचे महत्त्वाचे घटक असूनही त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. ज्या ताटात निसर्गाची देणगी कमी आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थांचे प्रमाण अधिक आहे, त्या ताटाकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे.

फास्ट फुडने तर धावपळीच्या जीवनाला आणखी वेग दिला आहे. शरीराला घाई नको असते; त्याला योग्य पोषण हवे असते. अधिक मीठ, साखर आणि चरबी असलेल्या पदार्थांचे वारंवार सेवन आरोग्यासाठी हितावह नाही. बाजारातील पदार्थ अधूनमधून चवीत बदल म्हणून खाणे वेगळे आणि त्यांनाच रोजच्या आहाराचा आधार बनवणे वेगळे. घरचे साधे जेवण कदाचित आकर्षक किंवा चटपटीत वाटणार नाही; पण शरीराच्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने ते अधिक उपयुक्त ठरू शकते. आहारातून मिळणारी अतिरिक्त ऊर्जा आणि जीवनातील कमी झालेला शारीरिक श्रम यांचा परिणाम शरीरावर अतिरिक्त चरबीच्या रूपाने दिसू लागला आहे. मुलेही या बदलापासून अलिप्त राहिलेली नाहीत. खेळाच्या मैदानाऐवजी स्क्रीन, घरच्या पौष्टिक खाण्याऐवजी पॅकेटमधील पदार्थ आणि मैदानी खेळाऐवजी मोबाईलवरील खेळ, अशी परिस्थिती निर्माण होत असेल तर पालकांनी वेळीच सजग होणे गरजेचे आहे.

दुसरीकडे, अपुरा किंवा असंतुलित आहार घेतल्यामुळे काही जण कृश होत चालले आहेत. अति लठ्ठपणा असो किंवा अति कृशतादोन्ही शरीराच्या असंतुलनाची चिन्हे आहेत. शरीराला उपाशी ठेवायचे नाही आणि अति खाऊ घालून त्याच्यावर भारही टाकायचा नाही. भुकेनुसार, पचायला हलके, पौष्टिक आणि संतुलित भोजन हा आरोग्याचा अधिक शाश्वत मार्ग आहे. आरोग्यास घातक पदार्थांपासून दूर राहणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अतिगोड पेये, शीतपेये, तंबाखू आणि मादक पदार्थ शरीरावर अनावश्यक भार टाकतात. तहान लागली की शरीराला सर्वप्रथम पाण्याची गरज असते; रंगीबेरंगी बाटलीतील पेयाची नव्हे.

मुलांना फळे, डाळी, भाज्या आणि घरचे पौष्टिक अन्न यापेक्षा बाजारातील चटपटीत पदार्थ अधिक आकर्षक वाटू लागले, तर पालकांनी त्याकडे केवळ हट्ट म्हणून न पाहता एक सवय म्हणून पाहिले पाहिजे. बालपणात लागलेल्या सवयी पुढे जीवनशैलीचा भाग बनतात. त्यामुळे मुलांना आरोग्यदायी आहाराची सवय लावण्याची जबाबदारी घरापासूनच सुरू होते. आरोग्यासाठी फार मोठ्या किंवा अवघड गोष्टी करण्याची गरज नाही. दररोज थोडे पायी चालणे, शरीराला पुरेसा श्रम देणे, पचायला हलका आणि पौष्टिक आहार घेणे, जेवणानंतर काही वेळ चालणे, खेळणे आणि योग–प्राणायामाला दिनचर्येचा भाग बनवणेया साध्या सवयीही मोठा फरक घडवू शकतात. रात्री उशिरा जड जेवण करून लगेच झोपणे टाळले पाहिजे. पुरेशी आणि नियमित झोप घेतली पाहिजे. दिवसभर एकाच जागी बसून राहण्याची सवय अधूनमधून मोडून शरीराला हालचाल दिली पाहिजे.

छोटे–छोटे शिस्तबद्ध नियम कालांतराने आरोग्याची मोठी शिदोरी बनतात. चवीवर संयम नसेल, तर तीच चव आरोग्याला घातक ठरू शकते. शरीराला श्रम मिळाला नाही, तर सुख–सुविधांचे रूपांतर जडत्वात होऊ शकते. झोपेचे नियोजन नसेल, तर अंथरुणात घालवलेला वेळही शरीराला अपेक्षित विश्रांती देऊ शकत नाही. आरोग्य हे औषधांच्या एखाद्या बाटलीत बंदिस्त असलेले काही नाही. ते आपल्या दिनचर्येत आहे, आपल्या ताटात आहे, आपल्या श्रमात आहे आणि आपल्या संयमात आहे. पैशाने सुख–सुविधा विकत घेता येतात; आरोग्य मात्र विकत घेता येत नाही. आजार झाल्यानंतर उपचार शोधण्यापेक्षा आजारांना आमंत्रण देणाऱ्या सवयींपासून वेळीच दूर राहणे अधिक शहाणपणाचे आहे.

निरोगी शरीर ही अचानक मिळणारी उपलब्धी नाही. संयमित आहार–विहार, नियमित दिनचर्या, पुरेशी झोप, शारीरिक हालचाल आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या एकत्रित परिणामातून ते घडते. म्हणून सुख–सुविधांना जीवनाचे अंतिम ध्येय न मानता, जीवन अधिक सुलभ करणारी साधने म्हणून त्यांचा वापर केला पाहिजे. कारण खरे सुख सुविधा वाढण्यात नाही, तर त्या सुविधांचा वापर करूनही शरीराला निरोगी, मनाला प्रसन्न आणि जीवनाला संतुलित ठेवण्यात आहे.

**–मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि.सांगली
मो. ७०३८१२१०१२

# महानुभाव पंथाचे चौथे अवतार गोविंद प्रभू महाराज



महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक इतिहासात बारावे शतक अत्यंत क्रांतिकारी ठरले. याच कालखंडात अंधश्रद्धा आणि विषमतेच्या अंधारात चाचपडणाऱ्या समाजाला ज्ञानाचा प्रकाश दाखवण्यासाठी महानुभाव पंथाचा उदय झाला. या पंथातील पंचकृष्णांपैकी चौथे अवतार म्हणजेच सर्वज्ञ श्री गोविंदप्रभू महाराज (श्री गुंडम राऊळ). आज त्यांच्या पावन जयंतीनिमित्त त्यांच्या अद्वितीय जीवनकार्याचा आणि सामाजिक क्रांतीचा वेध घेणारा लेख.

महाराष्ट्राच्या पावन भूमीला विचारवंतांचा, समाजसुधारकांचा आणि संतांचा एक प्रदीर्घ आणि देदीप्यमान वारसा लाभला आहे. या पवित्र भूमीने प्रत्येक शतकात अशा थोर विभूतींना जन्म दिला, ज्यांनी समाजातील अनिष्ट रूढी–परंपरा, अंधश्रद्धा आणि विषमतेविरुद्ध आवाज उठवून मानवतेला एक नवीन दिशा दिली. सुमारे आठशे वर्षांपूर्वी (१३ व्या शतकात) महाराष्ट्रात यादव राजसत्तेचे वैभव शिखरावर होते. परंतु, याच काळात धार्मिक कर्मकांडांचे स्तोम माजले होते, जातीव्यवस्थेच्या भिंती अभेद्य करून ठेवल्या होत्या आणि समाज कमालीचा अंधश्रद्धेच्या गर्तेत रुतला होता. अशा अत्यंत बिकट आणि आव्हानात्मक कालखंडात महाराष्ट्राच्या मातीत समता, बंधुता, विवेकवाद आणि भक्तीची एक प्रचंड लाट आली. या लाटेचे नाव म्हणजेच महानुभाव पंथ.

सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांनी स्थापन केलेल्या या पंथाच्या मपंचकृष्णफ (पंच अवतार) संकल्पनेमध्ये श्री गोविंद प्रभू महाराज (ज्यांना लोक प्रेमाने श्री गुंडम राऊळ म्हणत) यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. ते महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्री चक्रधर स्वामींचे गुरू तसेच पंथाचे चतुर्थ अवतार मानले जातात. अमरावती जिल्ह्यातील ऋद्धपूर (रिद्धपूर) ही त्यांची मुख्य कर्मभूमी होती, ज्याला आज महानुभाव पंथात मपरमेश्वरपूरफ किंवा ममहानुभावांची काशीफ म्हणून अनन्यसाधारण महत्त्व आहे. आजच्या आधुनिक युगातही त्यांचा जीवनप्रवास आणि क्रांतिकारी सामाजिक दृष्टिकोन तितकेच प्रासंगिक आणि मार्गदर्शक आहेत.

श्री गोविंद प्रभू यांचा जन्म विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील काठसुरे या गावी इ.स. ११८७ (भाद्रपद शुक्ल त्रयोदशी) रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अनंतनायक आणि मातेचे नाव नेमाईसा होते. त्यांचे मूळ नाव मगुंडम राऊळफ असे ठेवण्यात आले होते. बालपणापासूनच गुंडम राऊळ यांच्यामध्ये सामान्य मुलांपेक्षा वेगळे चैतन्य, निर्भीडता आणि एक अनाकलनीय अलौकिक तेज जाणवत होते. त्यांचे वागणे, बोलणे आणि विचार करण्याची पद्धत अत्यंत स्वतंत्र आणि रूढीमुक्त होती.पुढे त्यांनी अमरावतीजवळील ऋद्धपूर (रिद्धपूर) येथे आपले कायमचे वास्तव्य केले. ऋद्धपूर हे गाव केवळ एक भौगोलिक ठिकाण राहिले नाही, तर ते श्री गोविंद प्रभूंच्या वास्तव्याने पवित्र झालेले एक विचारांचे केंद्र बनले. महानुभाव पंथात या भूमीला सर्वाधिक पवित्र मानले जाते.

महानुभाव पंथाच्या लीळाचरित्र व श्री गोविंदप्रभू चरित्रग्रंथांमध्ये श्री गोविंद प्रभूंच्या सामाजिक क्रांतीच्या अनेक लीळा नोंदवलेल्या आहेत. नैसर्गिक संसाधनांवरील सर्वांच्या समान अधिकाराची साक्ष देणारी अशीच एक क्रांतिकारी लीळा गावातील विहिरीच्या पाण्याच्या अधिकाराशी जोडलेली आहे जी श्री गोविंद प्रभूंच्या समतावादी दृष्टिकोनाचे उत्तम उदाहरण आहे. एकदा गावातील उपेक्षित समाजाला सार्वजनिक विहिरीवरून पाणी भरण्यास विशिष्ट लोकांनी लोकांनी बंदी घातली होती. पिण्याच्या पाण्यासाठी त्या बांधवांचे प्रचंड हाल होत होते. ही वेदनादायक बातमी जेव्हा श्री गोविंद प्रभूंपर्यंत पोहोचली, तेव्हा ते शांत बसले नाहीत. ते स्वतः पुढे आले. त्यांनी कोणत्याही सामाजिक दबावाची पर्वा न करता, समाजातील सर्व घटकांना एकत्र केले. त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन एक नवीन विहीर खोदायला लावली आणि पाण्याचा अधिकार सर्वांसाठी समान करून दिला. हा त्या काळातील अत्यंत धाडसी आणि क्रांतिकारी निर्णय होता त्यामुळे लोक त्यांनी राऊळ माय राऊळ बाप म्हणत.

श्री गोविंद प्रभूंच्या मनात प्रत्येक जीवाबद्दल अथांग करुणा होती. समाजाने नाकारलेल्या, पीडित आणि सोशिक लोकांचे ते हक्काचे कैवारी होते. तत्कालीन समाजात स्त्रियांना केवळ चूल आणि मूल यापुरते मर्यादित ठेवून धार्मिक अधिकारांपासून वंचित ठेवले गेले होते. श्री गोविंद प्रभूनी स्त्रियांना पंथात आदराचे स्थान दिले. श्री चक्रधर स्वामींच्या प्रमुख शिष्या महदाइसा (महदंबा) यांना श्री गोविंद प्रभूंचा मोठा वरदहस्त लाभला होता. श्री गोविंद प्रभूंच्या या भूमिकेमुळेच पुढे चालून महदंबेने मराठीतील पहिले काव्य (धवळे) रचले.

महानुभाव पंथाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत दिलेले योगदान आणि मराठी भाषेच्या समृद्धीसाठी केलेले कार्य हे सुवर्णअक्षरांनी लिहून ठेवण्यासारखे असून विशेषतः संस्कृतच्या प्रभावाखालील काळात मराठीला मधर्मभाषाफव झलोकभाषेचाञ दर्जा देऊन त्यांनी मराठी साहित्याचा जो पाया रचला ते कधीही विसरता येणार नाही. मराठी भाषेचा आद्यग्रंथ मलीळाचरित्रफ देऊन साहित्याची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या महानुभाव पंथाने महाराष्ट्राला दिलेली वैचारिक दृष्टी आणि मराठी भाषेची केलेली सेवा सदैव वंदनीय राहील. श्री गोविंद प्रभू आणि श्री चक्रधर स्वामी यांनी आपले सर्व विचार आणि तत्त्वज्ञान मराठीत मांडले. श्री गोविंद प्रभू यांच्या महान कार्याची, त्यांच्या स्वभावाची आणि त्यांच्या दैनंदिन लीळांची (प्रसंगांची) अत्यंत प्रामाणिक नोंद त्यांचे शिष्य म्हाइंभट यांनी केली. त्यांनी इ.स. १२८७ च्या सुमारास मश्री गोविंदप्रभू चरित्रफ (यालाच मऋद्धपूरचरित्रफ असेही म्हणतात) या ग्रंथाची रचना केली.

मराठी साहित्याचा इतिहास महानुभाव पंथाचा उल्लेख केल्याशिवाय पूर्ण होऊच शकत नाही. म्हाइंभट यांनी लिहिलेला मश्री गोविंदप्रभू चरित्रफ हा ग्रंथ मराठीतील सुरुवातीच्या श्रेष्ठ चरित्रग्रंथांपैकी एक आहे. हा ग्रंथ केवळ धार्मिक नाही, तर तो १२–१३ व्या शतकातील महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि भाषिक परिस्थितीचा तसेच यादवकालीन महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाचा एक अत्यंत महत्त्वाचा ऐतिहासिक दस्तऐवज आहे.हा ग्रंथ केवळ धार्मिक ग्रंथ नसून, म्हाइंभट यांनी श्री गोविंद प्रभूंचे चरित्र लिहिताना त्यात कोणतीही अतिशयोक्ती किंवा काल्पनिक चमत्कारांचे स्तोम माजवले नाही. त्यांनी श्री गोविंद प्रभू जसे जगले, जसे वागले, त्याचे हुबेहूब आणि वास्तववादी चित्रण केले. या ग्रंथाची भाषा अत्यंत सुटसुटीत, प्रवाही आणि रसाळ आहे. १२–१३ व्या शतकातील विदर्भातील बोलीभाषेचे आणि लोकसंस्कृतीचे अत्यंत सुंदर दर्शन या ग्रंथातून घडते..

इ.स. १२८५ च्या सुमारास त्यांनी ऋद्धपूर येथे आपले अवतारकार्य संपुष्टात आणले. त्यांनी आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण हा समाजातील पीडित, उपेक्षित आणि दुःखी लोकांच्या कल्याणासाठी खर्च केला. ते केवळ एका विशिष्ट पंथाचे नव्हते, तर ते संपूर्ण मानवजातीचे कल्याण चिंतणारे मानवात वावरणारे जगद्गुरू व ईश्वरीय अवतार होते. त्यांनी दिलेला समतेचा, करुणेचा, सामाजिक न्यायाचा आणि लोकभाषेचा विचार आज शेकडो वर्षांनंतरही तितकाच महत्वाचा, प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे. त्यांचे हे क्रांतिकारी आणि सर्वसमावेशक कार्य आजच्या लोकशाही व्यवस्थेतही तितकेच प्रासंगिक आणि दिशादर्शक ठरते. भौतिकतेच्या मागे धावणाऱ्या आजच्या अस्वस्थ समाजात परस्पर सलोखा आणि शांती रुजवण्यासाठी श्री गोविंदप्रभूंचे विचार आणि जीवनपद्धती दीपस्तंभासारखी मार्गदर्शक आहे. समतेचा हाच संदेश देणाऱ्या या ईश्वरीय अवताराच्या चरणी कोटी कोटी दंडवत प्रणाम! चला, त्यांच्या चरणी लीन होऊन, त्यांनी दाखवलेल्या समतेच्या वाटेवर चालण्याचा आपण प्रामाणिक संकल्प करूया!

भेदाभेद मिटवून ज्यांनी
मानवधर्माची गुढी उभारली;
श्री गोविंद प्रभूंच्या तेजाने
महाराष्ट्राची संस्कृती समृद्ध झाली
महदंबेच्या 'धवळ्यातून' पाझरली
अमृताची मधुर वाणी;
कृतकृत्य झाली अखंड
महाराष्ट्राची ही पावन धरणी
ओठांवरती अखंड राहो
श्रीप्रभूंचेच पवित्र नाम;
त्यांच्याच पावन चरणी असो
हा साष्टांग दंडवत प्रणाम!

**डॉ. गोपाळ मोहनराव कदम**
(चीफ रिसर्च सायंटिस्ट)
मु. पो. लिंबगाव (रे. स्टे.),
ता. जि. नांदेड
मो. ९७०४४२१००५

# भारतीय खेळाडूंच्या कामगिरीत नवी भरारी



आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये भारताची कामगिरी हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा विषय आहे. सुरुवातीच्या काळात मर्यादित खेळांमध्ये पदके मिळवणाऱ्या भारताने आता विविध क्रीडाप्रकारांमध्ये आपली ताकद सिद्ध केली आहे. भारतीय खेळाडूंच्या मेहनतीमुळे आणि सातत्यपूर्ण कामगिरीमुळे भारताची आशियाई क्रीडाक्षेत्रातील ओळख अधिक व्यापक झाली आहे.

हांगझोऊ येथे झालेल्या २०२३ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने प्रथमच १०० पदकांचा टप्पा ओलांडला. भारताने या स्पर्धेत १०७ पदके जिंकली. ॲथलेटिक्स, नेमबाजी, तिरंदाजी, कुस्ती, बॅडमिंटन, हॉकी आणि कबड्डी यांसारख्या खेळांमध्ये भारतीय खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. या यशामुळे भारतीय क्रीडाक्षेत्रात नव्या आशा निर्माण झाल्या.

नीरज चोप्रासारख्या भालाफेकपटूने आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण केलेली ओळख, भारतीय महिला खेळाडूंची वाढती चमक, नेमबाजी आणि तिरंदाजीतील यश, तसेच सांघिक खेळांमधील भारताची कामगिरी यामुळे देशातील तरुणाईला क्रीडाक्षेत्राकडे वळण्याची प्रेरणा मिळत आहे. पदक जिंकणाऱ्या खेळाडूंच्या यशामागे त्यांचे अनेक वर्षांचे कठोर परिश्रम, शिस्त, त्याग आणि संघर्ष दडलेला असतो. त्यामुळे त्यांच्या यशाकडे केवळ पदकांच्या आकडेवारीतून न पाहता त्यांच्या जिद्दीच्या प्रवासातून पाहणे आवश्यक आहे.

**क्रीडा विकासासाठी आशियाई स्पर्धांचे महत्त्व**

आशियाई क्रीडा स्पर्धा म्हणजे केवळ पदकांची चढाओढ नव्हे. या स्पर्धांमुळे विविध देशांतील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभव मिळतो. त्यांना आपली क्षमता तपासण्याची, प्रतिस्पर्ध्यांकडून शिकण्याची आणि आगामी ऑलिम्पिक स्पर्धांसाठी तयारी करण्याची संधी मिळते. अनेक खेळाडूंसाठी आशियाई क्रीडा स्पर्धा हे जागतिक स्तरावरील यशाचे महत्त्वाचे पाऊल ठरते.

या स्पर्धांमुळे यजमान शहरांमध्ये क्रीडा सुविधा विकसित होतात, पर्यटनाला चालना मिळते आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही हातभार लागू शकतो. मात्र, स्पर्धांसाठी उभारण्यात येणाऱ्या सुविधांचा उपयोग स्पर्धा संपल्यानंतरही सर्वसामान्य नागरिकांना आणि नवोदित खेळाडूंना झाला पाहिजे. क्रीडा सुविधांची निर्मिती करताना दीर्घकालीन नियोजन आणि सार्वजनिक पैशांचा योग्य वापर यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

**भारतासमोरील आव्हाने आणि पुढील दिशा**

भारतात क्रिकेटला मोठी लोकप्रियता आणि आर्थिक पाठबळ मिळत असले, तरी इतर खेळांनाही समान संधी, सुविधा आणि प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात अनेक प्रतिभावान खेळाडू आहेत; परंतु योग्य प्रशिक्षण, दर्जेदार क्रीडा साहित्य, प्रशिक्षक, आहार आणि आर्थिक मदतीच्या अभावामुळे त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

देशातील क्रीडा धोरण आखताना केवळ पदकविजेत्यांचा गौरव करून चालणार नाही, तर पदकासाठी प्रयत्न करणाऱ्या खेळाडूंनाही आवश्यक आधार मिळायला हवा. शालेय स्तरापासूनच खेळांना प्रोत्साहन देणे, ग्रामीण भागात क्रीडा अकादमी उभारणे, महिला खेळाडूंना सुरक्षित आणि समान संधी उपलब्ध करून देणे, तसेच प्रशिक्षकांच्या गुणवत्तेत सुधारणा करणे आवश्यक आहे.

खेळाडूंच्या कामगिरीचे मूल्यमापन करताना पदकांबरोबरच त्यांच्या प्रशिक्षणाच्या सुविधा, दुखापतींवरील उपचार, मानसिक आधार आणि निवृत्तीनंतरच्या सुरक्षिततेचाही विचार व्हायला हवा. खेळाडू घडवणे ही केवळ सरकारची जबाबदारी नसून क्रीडा संघटना, शैक्षणिक संस्था, पालक आणि समाज यांनीही त्यासाठी योगदान देणे आवश्यक आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धा हा आशियाच्या क्रीडासामर्थ्याचा, एकतेचा आणि खिलाडूवृत्तीचा उत्सव आहे. या स्पर्धांमधील प्रत्येक पदक हे खेळाडूच्या मेहनतीचे, प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाचे आणि देशाच्या क्रीडा व्यवस्थेच्या प्रयत्नांचे प्रतीक असते. भारताने आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये मिळवलेले यश निश्चितच प्रेरणादायी आहे; मात्र या यशाचे सातत्य टिकवण्यासाठी क्रीडा क्षेत्रात पायाभूत बदल घडवून आणणे गरजेचे आहे.

पदकांची संख्या वाढवणे हे महत्त्वाचे असले, तरी प्रत्येक गुणवंत खेळाडूला संधी मिळवून देणे हे त्याहून मोठे उद्दिष्ट असले पाहिजे. आशियाई क्रीडा स्पर्धांमधून प्रेरणा घेऊन भारताने क्रीडा संस्कृती अधिक व्यापक करावी. देशातील प्रत्येक गावातून, प्रत्येक शाळेतून आणि प्रत्येक कुटुंबातून नवे खेळाडू घडावेत. भारतीय तिरंगा आशियाई क्रीडांगणावर सातत्याने अभिमानाने फडकत राहावा आणि भारत जागतिक क्रीडाक्षेत्रातही आपली ओळख अधिक बळकट करावा, हीच अपेक्षा!

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# संभाव्य दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंधारणाची कामे हाती घ्यावीत -जिल्हाधिकारी कर्डिले

## नांदेड जिल्ह्यात १ लाख जलतारा करण्याचा संकल्प; ३५ हजार ७७५ प्रस्ताव प्राप्त, २८ हजार ४०१ कामांना प्रशासकीय मान्यता

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात चालू पावसाळी हंगामात अपेक्षित सरासरीच्या तुलनेत पर्जन्यमानात घट झाली आहे. त्यामुळे आगामी काळात संभाव्य पाणीटंचाई व दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता उपलब्ध पावसाच्या पाण्याचे जास्तीत जास्त संवर्धन करून भूजल पातळी वाढविण्यासाठी प्रभावी जलसंधारणाची कामे हाती घेणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर सेवा संकल्प अभियानांतर्गत रोजगार हमी व विकसित भारत रोजगार व आजीविका हमी ग्रामीण योजनेच्या माध्यमातून जलतारा, सिमेंट नाला बांध, विहिरींचे पुनर्भरण तसेच बोअरवेल/बोअर पुनर्भरणाची कामे मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात येत आहेत.

ग्रामीण भागातील कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून देतानाच टिकाऊ व उत्पादक मालमत्ता निर्माण करणे, हा रोजगार हमी योजनेचा प्रमुख उद्देश आहे. जमीन, पाणी व वृक्षांच्या विकासातून शेती व शेतीशी संबंधित उत्पादक मालमत्ता निर्माण करण्यावर या योजनेत विशेष भर देण्यात आला आहे. या माध्यमातून गावातील नागरिकांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होण्यासोबतच पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी ते अडवून जमिनीत मुरविण्यास मदत होणार आहे.

शेतकरी, ग्रामस्थ व नागरिकांनी आपल्या गावातील तसेच शेतजमिनीवरील आवश्यक जलसंधारणाच्या कामांचे प्रस्ताव संबंधित ग्रामपंचायतीकडे सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. यामध्ये जलतारा, सिमेंट नाला बांध, विहीर पुनर्भरण आणि बोअरवेल/बोअर पुनर्भरण या कामांना प्राधान्य देता येणार आहे.

ज्या शेतकरी व नागरिकांना त्यांच्या शेतजमिनीवर किंवा परिसरात ही कामे घ्यावयाची आहेत, त्यांनी संबंधित ग्रामपंचायत कार्यालय, ग्रामसेवक, ग्रामरोजगार सेवक किंवा पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधून कामाची मागणी नोंदवावी. प्राप्त मागणी व प्रस्तावांची प्रचलित नियमांनुसार तपासणी करून पात्र व अनुज्ञेय कामांचे नियोजन करण्यात येणार आहे.

ग्रामपंचायतींनीदेखील आपल्या कार्यक्षेत्रातील जलस्रोत, नाले, पाणलोट क्षेत्र, विहिरी व बोअरची सद्यस्थिती लक्षात घेऊन आवश्यक कामांचे प्राधान्यक्रम निश्चित करावेत. तसेच ग्रामसभेत या कामांचा एकत्रित आराखडा तयार करून मान्यतेनंतर पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतातील पाणी एकवटणाऱ्या उताराच्या ठिकाणी अथवा जमीन चिभडणाऱ्या ठिकाणी साधारण ५ फूट रुंद, ५ फूट लांब व ६ फूट खोल खड्डा तयार करून त्यामध्ये मोठे व मध्यम आकाराचे दगड भरून जलतारा तयार केला जातो. एका जलताऱ्यातून सुमारे ३.६० लाख लिटर पाणी जमिनीत मुरविण्याची क्षमता असल्याने विहीर व बोअरवेलमधील पाणीसाठा वाढण्यास मदत होते.

जलताऱ्यांसह विहीर व बोअर पुनर्भरणाच्या कामांमुळे पावसाचे पाणी स्थानिक पातळीवर अडवून जमिनीत मुरविणे, भूजल पातळी वाढविणे आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता टिकविणे शक्य होणार आहे. रोजगार हमीच्या माध्यमातून ही कामे केल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना स्थानिक पातळीवर रोजगारही उपलब्ध होणार आहे.

नांदेड जिल्ह्यात १ लाख जलतारा करण्याचा संकल्प जिल्हा प्रशासनाने केला आहे. त्यादृष्टीने कामाला गती देण्यात आली असून, आतापर्यंत जिल्ह्यात ३५ हजार ७७५ जलतारांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ३१ हजार ३६० कामांना तांत्रिक मान्यता, तर २८ हजार ४०१ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यापैकी २ हजार १ जलताऱ्यांची कामे प्रत्यक्ष सुरू झाली आहेत.

जलसंधारणाच्या या कामांमुळे संभाव्य पाणीटंचाई व दुष्काळसदृश परिस्थितीवर मात करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पुढाकार घेऊन आपल्या गावातील व शेतजमिनीवरील आवश्यक जलतारा, सिमेंट नाला बांध, विहीर पुनर्भरण, बोअरवेल/बोअर पुनर्भरण तसेच इतर जलसंधारणाच्या कामांचे प्रस्ताव तातडीने संबंधित ग्रामपंचायतीकडे सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

पाणी अडवा-पाणी जिरवा, भूजल वाढवा-पाणीटंचाई टाळा या उद्देशाने ग्रामस्थ, शेतकरी व ग्रामपंचायतींनी जलसंधारणाच्या कामांमध्ये व्यापक सहभाग नोंदवावा, असेही जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# किनवट शहरात मोकाट कुत्र्यांचा उच्छाद; बंदोबस्त करण्यात पालिका अपयशी

## सर्वच प्रभागांत झुंडीने कुत्र्यांचा वावर; लहान मुले, नागरिकांमध्ये दहशत



**किनवट (प्रतिनिधी)** –किनवट शहरातील विविध भागांत मोकाट कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून, त्यांचा बंदोबस्त करण्यात नगरपालिका प्रशासन अपयशी ठरत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

शहरातील जवळपास सर्वच प्रभागांत कुत्र्यांच्या झुंडी रस्त्यावर फिरताना दिसत असून, लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मोकाट कुत्री अचानक रस्त्यावर धावत येत असल्याने दुचाकीस्वारांचे नियंत्रण सुटून अपघात होण्याचा धोका वाढला आहे. महिनाभरापूर्वी सुभाषनगर परिसरात मोकाट कुत्र्यांनी एका मुलावर हल्ला करून त्याला जखमी केल्याची घटना घडली होती. या घटनेनंतरही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झाली नाही. मंगळवार, दि. २२ रोजी सकाळी वेलमापुरा परिसरात झुंडीने भांडत येणाऱ्या मोकाट कुत्र्यांमुळे एका वृद्ध महिलेची धावपळ उडाली. कुत्र्यांच्या भीतीने ती रस्त्यावर पडल्याची घटना घडली. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली. या घटनेमुळे नागरिकांमध्ये पुन्हा एकदा मोकाट कुत्र्यांच्या बंदोबस्ताचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

**पालिकेची मोहीम ठरली कुचकामी**

काही दिवसांपूर्वी मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पालिकेने कुत्री पकडून शहराबाहेर सोडण्याची मोहीम राबविली होती. मात्र, ही मोहीम गुंडाळल्यानंतर परिस्थिती पुन्हा जैसे थे झाली आहे. उलट शहरात पूर्वीपेक्षा अधिक संख्येने मोकाट कुत्री दिसून येत आहेत. शहराच्या रामनगर, वेलमापुरा, इस्लामपुरा, मोमीनपुरा, नालागड्डा यासह शहरातील विविध भागांत तसेच गोकुंद्यात मोकाट कुत्र्यांच्या झुंडी फिरताना दिसत आहेत. रात्रीच्या वेळी या कुत्र्यांचा उपद्रव आणखी वाढत असल्याने नागरिकांना घराबाहेर पडताना काळजी घ्यावी लागत आहे.

**व्यापक मोहीम राबविण्याची मागणी**

पालिका प्रशासनाला अपेक्षित यश आलेले नसताना आता मोकाट कुत्र्यांच्या समस्येनेही गंभीर रूप धारण केले आहे. त्यामुळे पालिकेने केवळ जुजबी कारवाई न करता शहरातील सर्व प्रभागांमध्ये व्यापक आणि सातत्यपूर्ण मोहीम राबवून मोकाट कुत्र्यांचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# सिडको आरोग्य केंद्रात दोन तज्ज्ञ डॉक्टरांची अतिरिक्त नियुक्ती

## काँग्रेसच्या आंदोलनानंतर मनपाकडून अधिकृत लेखी माहिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेच्या सिडको आरोग्य केंद्रातील डॉक्टरांच्या अनियमित उपस्थिती विरोधात सिडको काँग्रेस कमिटीच्या वतीने नुकतेच ठिय्या आंदोलन करण्यात आले होते. दरम्यान सदर आंदोलनानंतर नियमित वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष शिंदे यांच्या व्यतिरिक्त दर गुरुवारी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. वर्षा कदम व बालरोगतज्ज्ञ डॉ. रितेश बिसेन या दोन तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आल्याची लेखी माहिती महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने काँग्रेसला देण्यात आली आहे. तरी नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांनी केले आहे.

महानगरपालिकेच्या सिडको आरोग्य केंद्रात डॉक्टर उपस्थितीत राहत नसल्याची वारंवार तक्रार नागरिकांमधून होत असल्याने सिडको ब्लॉक काँग्रेस अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांनी शिष्टमंडळासह एक सप्टेंबर रोजी आरोग्य केंद्रास भेट दिली असता तीन तास होऊनही डॉक्टर उपस्थित नसल्याचा गंभीर प्रकार आढळून आला होता. तातडीने डॉक्टर उपलब्ध करून देण्याची मागणी करत काँग्रेस शिष्टमंडळाने आरोग्य केंद्रापुढे ठिय्या आंदोलन सुरू केले होते. डॉक्टर उपस्थित झाल्यानंतरच आंदोलन मागे घेत डॉक्टरांच्या उपस्थितीबदल निवेदन देण्यात आले होते. काँग्रेसच्या या आक्रमक पवित्र्यानंतर मनपा आरोग्य विभागाने नियमित आरोग्य अधिकारी डॉ. संतोष शिंदे यांच्या व्यतिरिक्त दर गुरुवारी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. वर्षा कदम व बालरोगतज्ज्ञ डॉ. रितेश बिसेन या दोन अतिरिक्त तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती केल्याची लेखी माहिती काँग्रेसला दिली आहे. दरम्यान नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटी अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांनी केले आहे.

# कबड्डी स्पर्धेत विद्यापीठाच्या मुलींच्या संघाची दमदार कामगिरी

## विभागीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि भोकर येथील दिगंबर बिंदू महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय आंतर महाविद्यालयीन कबड्डी (मुले व मुली) क्रीडा स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिसरातील मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत द्वितीय क्रमांक पटकावला.

दि. १६ सप्टेंबर, २०२६ रोजी झालेल्या या स्पर्धेत विद्यापीठाच्या मुलींच्या संघाने सांघिक कौशल्य, आक्रमक चढाया आणि भक्कम बचावाच्या जोरावर उल्लेखनीय कामगिरी केली. संघातील खेळाडूंनी संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट समन्वय राखत प्रतिस्पर्धी संघांना कडवी झुंज दिली.

या यशस्वी संघात पल्लवी लोटे, उज्ज्वला कदम, प्रणिता कोटमोड, स्नेहल वाघमारे, दुर्गा परघणे, सृष्टी राऊत, सानिया शेख, पुनम आठवले आणि दुर्गा पेठेवाड यांचा समावेश आहे.

संघाच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार आणि क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

संघाचे मार्गदर्शक विजय जाधव तसेच क्रीडा विभागाचे कर्मचारी संजयसिंह ठाकूर, रामा किरकण, शिवाजी हंबर्डे, सुनील लुटे, सुभाष थेटे आणि रतनसिंग पुजारी यांनी या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

# भागीरथी बच्चेवार यांना ज्येष्ठ नागरिक कृतज्ञता पुरस्कार जाहीर



**नांदेड (प्रतिनिधी)–** मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी जाहीर करण्यात आलेल्या राज्यस्तरीय पुरस्कारांमध्ये नांदेडच्या भागीरथी बच्चेवार यांची निवड झाली आहे.

भागीरथी बच्चेवार यांनी आपल्या सामाजिक कार्यातून दिलेले योगदान प्रेरणादायी असून व कर्तृत्ववान स्त्रियांच्या कार्याची दखल राज्यस्तरावर घेण्यात आली आहे. या प्रतिष्ठेच्या पुरस्कार सौ. बच्चेवार यांना मिळाल्याबद्दल नांदेड जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. येत्या ४ ऑक्टोबर २०२६ रोजी मुंबईत हा सोहळा संपन्न होणार आहे.

पान १ वरून...

**नांदेड तालुक्यातील ५४...**

नसरतपूर/हस्सापूर, वांगी/वाडी/करडेल, वाघी, राहाटी (बु), पिंपळगाव कोरका, ढोकी, सायाळ, बोंढार तर्फे हवेली, कल्लाळ, काकांडीतर्फे तुप्पा, त्रिकुट/वाडी झांजी, वाहेगाव, बोरगाव तेलंग, वाडी पुयड आणि धनगरवाडी.

**नागरिकांचा मागास प्रवर्ग (८ गावे) :** आलेगाव, कासारखेडा, पांगरी, खडकुत/जमशेटवाडी, वाडी (बु), चिखली (बु), कामठा (खु), वडगाव.

**नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला (९ गावे) :** निळा, धनेगाव/ मुजामपेठ, मरळक, सिद्धनाथ, नेरली, फत्तेपूर/ इलीचपूर, पिंपळगाव निमजी, वानेगाव/वरखेड/ भानपूर आणि वडवणा/खडकी.

# औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी आचारसंहितेचे काटेकोर पालन करा -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले



**नांदेड (प्रतिनिधी)–** औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक- २०२६ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी राहुल कर्डिले यांनी विविध शासकीय विभागांच्या प्रमुखांना दिले.

आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व विभाग प्रमुखांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी उपजिल्हाधिकारी राजकुमार माने यांच्यासह जिल्ह्यातील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पदवीधर, शिक्षक तसेच स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या निवडणुकांनाही आदर्श आचारसंहितेच्या तरतुदी लागू आहेत. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कोणत्याही शासकीय यंत्रणेकडून आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले.

पदवीधर मतदारांवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रभाव पडेल अशी कोणतीही नवीन शासकीय योजना किंवा धोरण जाहीर अथवा मंजूर करू नये. तसेच पदवीधर मतदारसंघातील शैक्षणिक संस्थांचे उद्घाटन किंवा पायाभरणी मंत्री महोदयांच्या हस्ते करू नये. निवडणूक कामाशी संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना मंत्र्यांच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी बोलावू नये, अशाही सूचना देण्यात आल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांची बैठक किंवा व्हीडीओ कॉन्फरन्स मंत्री महोदयांमार्फत आयोजित करू नये. अत्यावश्यक नियमित बैठका केवळ जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीने घेता येतील, असे स्पष्ट करण्यात आले.

खासदार, आमदार व विधानपरिषद सदस्य निधी योजनेंतर्गत आयटी प्लॅटफॉर्मद्वारे कोणत्याही नवीन कामास मंजुरी देऊ नये. तसेच

# स्वच्छता ही सेवा आणि स्वच्छ सेवा संकल्प अभियानाला नांदेड जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वच्छ, सुंदर आणि निरोगी गावांची निर्मिती करण्याच्या उद्देशाने नांदेड जिल्ह्यात स्वच्छता ही सेवा आणि स्वच्छ सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध गावांमध्ये स्वच्छता उपक्रम राबविण्यात येत आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत ग्रामपंचायतींनी स्वच्छता मोहिमेला गती दिली आहे.

या अभियानांतर्गत गावातील शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालय, सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, परिसर तसेच इतर महत्त्वाच्या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्वच्छतेसोबतच नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात येत असून, सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्याचा संदेश देण्यात येत आहे.

या मोहिमेत महिला बचतगटांच्या सदस्यांसह युवक, विद्यार्थी, शिक्षक, पालक, पदाधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सामूहिक सहभागातून गावाच्या स्वच्छतेची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारावी यासाठी विविध उपक्रमांद्वारे नागरिकांना प्रेरित करण्यात येत आहे.

स्वच्छता ही केवळ एका अभियानापुरती मर्यादित न राहता ती गावकऱ्यांच्या दैनंदिन जीवनशैलीचा आणि सामूहिक जबाबदारीचा भाग बनावी, यासाठी ग्रामपंचायत स्तरावर सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि लोकसहभागातून स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी गावांची निर्मिती करण्याचा संकल्प या अभियानातून करण्यात येत आहे.

# रोजगारक्षम तरुणाई घडवा; गुन्हेगारीला आळा घाला -शिवाजीराजे पाटील



**नांदेड (प्रतिनिधी)–** आर्थिक कुचंबणा, वाढती व्यसनाधीनता, श्रमाची लाज आणि रोजगाराच्या अपुऱ्या संधी यांसारख्या विविध कारणांमुळे अनेक तरुण गुन्हेगारीकडे वळत आहेत. कौशल्य आणि भांडवलाच्या अभावामुळे रोजगारक्षम तरुणाईची निर्मिती अपेक्षित प्रमाणात होत नाही. त्यामुळे केवळ सरकार सर्वकाही करेल, या मानसिकतेवर अवलंबून राहण्याचे दिवस आता संपुष्टात आले आहेत. व्यसनाधीनतेसह अनेक सामाजिक प्रश्नांच्या मुळाशी बेरोजगारीचा प्रश्न असल्याचे प्रतिपादन दैनिक गोदातीर समाचारचे पत्रकार तथा नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू लिडरशिप इन्स्टिट्यूटचे मास्टर कोच इंजि. शिवाजीराजे पाटील यांनी केले.

रविवार, दि. २० सप्टेंबर रोजी संपन्न झालेल्या राहत क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या दहाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेत प्रमुख वक्ते म्हणून दि बेस्ट मोटिव्हेटर शिवाजीराजे पाटील बोलत होते.

रियाजुल हसन आमेर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या वार्षिक सर्वसाधारण सभेस तेलंगणा प्रदेशाध्यक्ष अब्दुल माजिद शफी, धर्मगुरू मुफ्ती अहमद खान, पठाण आमेद खान, मुहम्मद युनूस, अब्दुल कदीर, अबरार देशमुख, अब्दुल जलील, फारुख शबिबी, सय्यद एजाज, मिर्झा बेग, प्रा. शेख महंमद समीम आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना इंजि. शिवाजीराजे पाटील म्हणाले की, व्यावसायिक दृष्टिकोन, कौशल्य विकास आणि त्यासोबतच भागभांडवलाची उभारणी यासाठी जमाते इस्लामी हिंदने घेतलेला पुढाकार स्तुत्य व अनुकरणीय आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत उच्च शिक्षण पोहोचविणे ही काळाची गरज आहे.

मराठा सेवा संघाच्या ३५ वर्षपूर्तीनिमित्त संत गाडगेबाबा प्रबोधन कक्ष व वीर भगतसिंग विद्यार्थी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने यंदा वर्षभर इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'गुणवत्ता विकास अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी जमाते इस्लामी हिंदने पुढाकार घ्यावा, असे आवाहन सुप्रसिद्ध स्टुडंट-पॅरेंट काऊन्सिलर शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी यावेळी केले.

# मसाप नांदेड व जिल्हा परिषदेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेला उदंड प्रतिसाद



**नांदेड (प्रतिनिधी)–** वाचन संस्कृती वृद्धिंगत व्हावी आणि मराठी भाषेचा जागर अधिक व्यापक व्हावा, या उद्देशाने मराठवाडा साहित्य परिषद, शाखा नांदेड आणि जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेला जिल्हाभरातून उदंड प्रतिसाद मिळाला.

इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित या स्पर्धेत जिल्हा परिषदेच्या तसेच खासगी अनुदानित, विनाअनुदानित, इंग्रजी व उर्दू माध्यमांच्या माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मराठी भाषा अधिक लोकाभिमुख, व्यवहाराभिमुख आणि सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनाशी जोडली जावी, विद्यार्थ्यांच्या विचार करण्याच्या कक्षा अधिक रुंदाव्यात, विविध विषयांवरील त्यांची आकलन क्षमता वाढावी, ग्रामपंचायतीच्या अधिकारापासून ते देशाच्या संविधानापर्यंत अनेक बाबींचा त्यांनी चिकित्सक दृष्टीने अभ्यास करावा व त्यातून त्यांचे स्वतः चे मत मांडावे या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना 'स्वच्छता अभियान व आपली जबाबदारी', 'सोशल मीडिया- दुधारी अस्त्र', 'माझे कुटुंब, माझी शाळा, माझे गाव, माझी जबाबदारी', 'संविधान आणि माझे कर्तव्य' असे चार विषय देण्यात आले होते.

जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये एकाच दिवशी ही निबंध स्पर्धा घेण्यात आली. नांदेड जिल्ह्यातील १६ ही पंचायत समित्यांचे गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षकांनी स्पर्धेच्या नियोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

प्रत्येक शाळेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे निबंध तालुकास्तरावर पाठविण्यात आले. तालुकास्तरीय परीक्षक समितीने प्राप्त निबंधांमधून प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे प्रत्येकी तीन निबंध निवडून जिल्हास्तरीय परीक्षणासाठी पाठविले. जिल्हास्तरावर प्राप्त झालेल्या निबंधांमधून प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच दोन उत्तेजनार्थ असे एकूण पाच विजेते निवडण्यात येणार आहेत.

या विजेत्यांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. येत्या १० ऑक्टोबर रोजी लोहा येथील डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी



# चेहऱ्यावर धूळ-मळ साचतोय?

## जाणून घ्या चेहऱ्यावर वाफ घेण्याची योग्य पद्धत

**चेहऱ्यावर धूळ, मळ आणि घाम चिकटल्यामुळे त्वचेची चमक कमी होते आणि रोमछिद्रे बंद होण्याची शक्यता वाढते. अशा वेळी चेहऱ्यावर वाफ घेणे अर्थात 'फेस स्टीमिंग' उपयोगी ठरू शकते. सौंदर्यतज्ज्ञ शहनाज हुसैन यांच्या मते, योग्य पद्धतीने वाफ घेतल्यास त्वचेची खोलवर स्वच्छता करण्यास मदत होऊ शकते. मात्र वाफ घेताना काही महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेणेही आवश्यक आहे. फेस स्टीमिंग ही पद्धत अनेक वर्षांपासून सौंदर्योपचाराचा एक भाग आहे. आयुर्वेदातील 'स्वेदन' या उपचारपद्धतीशीही तिचा संबंध आहे. आजही त्वचेची खोलवर स्वच्छता करण्यासाठी अनेक जण चेहऱ्यावर किंवा शरीरावर वाफ घेतात. यासाठी स्पा आणि सौना केंद्रांमध्येही विविध सुविधा उपलब्ध असतात.**

### फेस स्टीमिंगमुळे त्वचेला काय फायदा होतो?

शहनाज हुसैन यांच्या मते, वातावरणातील आर्द्रतेमुळे धूळ आणि घाम त्वचेवर चिकटू शकतो. त्यामुळे रोमछिद्रे बंद होऊन मुरुमांची समस्या वाढण्याची शक्यता असते. अशा वेळी चेहऱ्यावर वाफ घेतल्याने त्वचेची खोलवर स्वच्छता करण्यास मदत होऊ शकते. वाफेमुळे त्वचा मऊ आणि कोमल होण्यास मदत होते. तसेच त्वचेवर साचलेले तेल आणि मळ सैल होऊ शकतो. फेस स्टीमिंगमुळे त्वचेवरील रोमछिद्रांमध्ये साचलेले तेल आणि मळ काही प्रमाणात सैल होतात. त्यानंतर हलक्या पद्धतीने एक्सफोलिएशन किंवा स्क्रबिंग केल्यास ब्लॅकहेड्स आणि व्हाइटहेड्स काढणे तुलनेने सोपे होऊ शकते.

### त्वचेला मिळते आर्द्रता

चेहऱ्यावर वाफ घेतल्याने त्वचेच्या बाह्य थराला आर्द्रता मिळते. वाफ घेतल्यानंतर त्वचेतील नैसर्गिक तेलाचे उत्पादन काही प्रमाणात वाढू शकते. त्यामुळे त्वचा नैसर्गिकरीत्या मॉइश्चराइज होण्यास मदत होते आणि तिचा लवचिकपणाही टिकून राहू शकतो. मात्र वाफ घेतल्यानंतर त्वचेला मॉइश्चराइज करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे फेस स्टीमिंगनंतर मॉइश्चरायझर किंवा सीरम लावायला विसरू नका. यामुळे त्वचा मऊ राहण्यास आणि तिची चमक टिकवून ठेवण्यास मदत होऊ शकते. फेस स्टीमिंगमुळे चेहऱ्यावरील रक्ताभिसरण तात्पुरते वाढू शकते. त्यामुळे त्वचेच्या ऊतींना अधिक ऑक्सिजन आणि पोषक घटक मिळण्यास मदत होते. यामुळे त्वचा अधिक तजेलदार दिसू शकते.

### चेहऱ्यावर वाफ घेण्याची योग्य पद्धत

चेहऱ्यावर वाफ घेण्यासाठी टॉवेल किंवा फेस स्टीमरचा वापर करता येतो. टॉवेलच्या मदतीने वाफ घेताना एक स्वच्छ, लहान टॉवेल घ्या. उष्णता सहन करू शकेल अशा भांड्यात किंवा पात्रात गरम पाणी घ्या. त्यात टॉवेल भिजवून तो चांगला पिळून घ्या आणि चेहऱ्यावर हलक्या हाताने ठेवा. मात्र टॉवेलवर उकळते पाणी थेट वापरू नका. टॉवेल खूप गरम असल्यास तो थोडा थंड होऊ द्या. त्वचेला भाजण्याचा धोका टाळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. फेस स्टीमरचा वापर करताना फेस स्टीमर वापरत असल्यास चेहरा उपकरणापासून योग्य अंतरावर ठेवा. विशेषतः नाक, हनुवटी आणि कपाळाच्या भागावर वाफ घेता येते. या भागांमध्ये ब्लॅकहेड्स आणि व्हाइटहेड्स अधिक प्रमाणात दिसू शकतात. एका वेळी सलग बराच वेळ वाफ घेऊ नका. सुरुवातीला २ ते ३ मिनिटे वाफ घ्या आणि त्यानंतर चेहरा वाफेपासून दूर करा. साधारण एक मिनिट विश्रांती घेऊन गरज असल्यास ही प्रक्रिया पुन्हा करता येते. एकूण कालावधी साधारण १० मिनिटांपेक्षा अधिक ठेवू नये. त्वचेला जितकी उष्णता आरामदायक वाटते तितकीच वाफ घ्या. जास्त उष्णता, जळजळ किंवा अस्वस्थता जाणवल्यास त्वरित वाफ घेणे थांबवा.

### जडी-बुटींच्या मदतीने अशी घ्या वाफ

हर्बल फेस स्टीमिंगसाठी एका भांड्यात पाणी उकळून त्यात संत्र्याच्या साली, वाळलेल्या गुलाबाच्या पाकळ्या, लॅव्हेंडर, निलगिरी यांसारख्या वाळलेल्या वनस्पतींचा वापर केला जाऊ शकतो. पाणी उकळल्यानंतर भांडे गॅसवरून खाली घ्या. डोक्यावर टॉवेल घेऊन चेहरा वाफेपासून सुरक्षित अंतरावर ठेवा. चेहरा पाण्यापासून साधारण ८ ते १० इंच अंतरावर ठेवणे योग्य ठरते. वाफ घेताना डोळे बंद ठेवा. डोळ्यांना उष्ण वाफेमुळे होणारी जळजळ टाळण्यास यामुळे मदत होऊ शकते. वाफ घेताना अस्वस्थता जाणवल्यास प्रक्रिया त्वरित थांबवा.

### आठवड्यातून किती वेळा घ्यावी वाफ?

सामान्य त्वचेसाठी आठवड्यातून दोन ते तीन वेळा फेस स्टीमिंग करता येऊ शकते. मात्र त्वचा कोरडी असल्यास अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. वाफ घेण्यापूर्वी त्वचेवर योग्य मॉइश्चरायझर वापरता येतो. अतिसंवेदनशील त्वचा असल्यास फेस स्टीमिंग टाळण्याचा सल्ला दिला जातो. वाफ घेतल्यानंतर त्वचेवर टोनर लावता येतो. त्यानंतर त्वचेतील आर्द्रता टिकवून ठेवण्यासाठी हलका मॉइश्चरायझर लावा. यामुळे त्वचा कोमल राहण्यास मदत होऊ शकते.

### जास्त वेळ वाफ घेतल्यास त्वचेची हानी

फेस स्टीमिंग करताना प्रमाण आणि कालावधी यांची काळजी घेणे आवश्यक आहे. खूप जास्त वाफ घेतल्यास त्वचेतील नैसर्गिक तेल कमी होऊ शकते. परिणामी त्वचा अधिक कोरडी, ताणलेली किंवा संवेदनशील वाटू शकते. अतिउष्णतेमुळे त्वचेतील रक्तवाहिन्यांवरही परिणाम होऊ शकतो. विशेषतः रोसेशिया किंवा एक्झिमा यांसारख्या त्वचारोगांचा त्रास असलेल्या व्यक्तींनी चेहऱ्यावर वाफ घेण्यापूर्वी त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे योग्य ठरेल. फेस स्टीमिंग ही त्वचेची स्वच्छता राखण्यासाठी वापरली जाणारी एक पूरक पद्धत आहे. वाफ घेताना तीव्र उष्णता टाळा, त्वचेची संवेदनशीलता लक्षात घ्या आणि प्रक्रियेनंतर त्वचेला योग्य मॉइश्चरायझिंग करा. त्वचेवर आधीपासून काही समस्या असल्यास स्वतःहून उपचार करण्याऐवजी तज्ज्ञांचा सल्ला घेणे अधिक सुरक्षित आहे.

# लिपस्टिक नीट लावता येत नाही?

## ओठांचा आकार अन् पोत लक्षात घेऊन असा करा योग्य मेकअप...

**लिपस्टिक लावली, पण ती ओठांच्या कडांवरून पसरते? ओठ कोरडे असल्याने लिपस्टिक आणखी खराब दिसते? किंवा पातळ ओठांवर लिपस्टिक कशी लावावी, हेच समजत नाही? योग्य पद्धतीने लिपस्टिक लावल्यास केवळ ओठांचा आकार अधिक उठावदार दिसत नाही, तर लिपस्टिक अधिक काळ टिकण्यासही मदत होते. ओठांचा आकार, पोत आणि नैसर्गिक रंग लक्षात घेऊन लिपस्टिक लावण्याची पद्धत थोडी बदलावी लागते...**



### या गोष्टी लक्षात ठेवा

लिपस्टिक लावण्यापूर्वी ओठांवर योग्य बेस तयार करा. सर्वप्रथम लिपलाइनरच्या मदतीने वरच्या ओठाच्या मध्यभागी असलेल्या कमानीला म्हणजेच 'लिप आर्च'ला आकार द्या आणि तो आकार ओठांच्या उर्वरित भागाशी जोडा. लिप आर्च फार टोकदार न ठेवता किंचित गोलाकार ठेवला तर अधिक नैसर्गिक दिसतो. मात्र चेहरा खूप गोल असल्यास किंचित टोकदार आकारही देता येतो. खालच्या ओठाच्या बाहेरील कोपऱ्याजवळ लिपलाइनर नैसर्गिक ओठांच्या रेषेच्या किंचित आतून लावा. त्यामुळे आकार असमतोल दिसत नाही. लिपस्टिक बाहेरून आतल्या दिशेने लावा. लिप ब्रशच्या मदतीने दोन्ही बाजूंनी बाहेरील कोपऱ्यापासून लिप आर्चच्या दिशेने रंग भरा. लिप आर्चजवळ ब्रशला हलकी गोलाई देऊन आकार पूर्ण करा. दोन्ही बाजूंच्या कमानी समान आहेत का, हे आरशात पाहून तपासा.

### लिपस्टिक अधिक काळ टिकवण्यासाठी...

लिपस्टिक दीर्घकाळ टिकावी असे वाटत असल्यास बोटावर थोडे पारदर्शक पावडर किंवा बेबी पावडर घेऊन लिपस्टिकवर हलक्या हाताने लावा. त्यानंतर अतिरिक्त पावडर पुसून टाका. यामुळे लिपस्टिक पसरण्याची शक्यता कमी होऊ शकते. लिपस्टिक खूप ट्रान्सफर होत असेल तर लिपस्टिक लावल्यानंतर ओठांवर टिश्यू ठेवा आणि हलकेच दाबून अतिरिक्त लिपस्टिक टिश्यूवर उतरवा. त्यानंतर टिश्यूच्या वरून हलकी पावडर लावा. त्यामुळे लिपस्टिकचा ट्रान्सफर कमी होण्यास मदत होते आणि ओठ अतिशय कोरडे किंवा मॅटही दिसत नाहीत.

### पातळ ओठांना द्या भरदार लुक

पातळ ओठ थोडे भरदार दिसावेत असे वाटत असल्यास लिपलाइनरचा योग्य वापर करता येतो. ओठांच्या नैसर्गिक रेषेच्या अगदी किंचित वरून लिपलाइनरने आकार द्या. मात्र संपूर्ण ओठांच्या बाहेरून रेषा ओढू नका. ओठ अधिक भरदार दिसावेत असे वाटणाऱ्या ठिकाणीच हलकेसे ओव्हरलाइन करा. विशेषतः वरच्या ओठाच्या मध्यभागी आणि खालच्या ओठाच्या मध्यभागी थोडासा फरक केल्याने पुरेसा परिणाम मिळू शकतो. यानंतर त्याच रंगाच्या लिपलाइनरने ओठांचा काही भाग हलका भरून घ्या आणि त्यावर लिपस्टिक लावा. लिपलाइनरचा रंग लिपस्टिकपेक्षा किंचित गडद असल्यास ओठांना अधिक स्पष्ट आकार मिळतो. त्यानंतर स्वच्छ, कोरड्या ब्रशच्या मदतीने लिपलाइनर आतल्या बाजूला लिपस्टिकमध्ये व्यवस्थित मिसळा. यासाठी नैसर्गिक किंवा न्यूड रंगाची लिपस्टिक निवडणे अधिक योग्य ठरू शकते. लिपलाइनर आणि लिपस्टिक व्यवस्थित ब्लेंड केल्यानंतर खालच्या ओठाच्या मध्यभागी अगदी थोडासा हायलायटर लावल्यास ओठ अधिक भरदार दिसू शकतात. मात्र हायलायटरचे प्रमाण कमी ठेवा आणि तो ओठांच्या बाहेरील भागावर लागू देऊ नका.

### मोठे ओठ असल्यास अशी लावा लिपस्टिक

मोठे किंवा भरदार ओठ असल्यास त्यांचा आकार लपवण्याची गरज नाही. योग्य प्रकारे आकार देऊन ते अधिक संतुलित दिसतील याची काळजी घेता येते. अशा वेळी लिपलाइनर ओठांच्या नैसर्गिक रेषेच्या आतच लावा. नैसर्गिक रेषेशी तो व्यवस्थित जुळवून घेतल्याने ओठ आणखी मोठे दिसणार नाहीत. ओठांचा उठाव थोडा कमी दिसावा असे वाटत असल्यास अतिशय चमकदार लिपस्टिक, ग्लॉस किंवा जास्त हायलायटरचा वापर टाळा. अगदी फिकट रंगांऐवजी मध्यम किंवा गडद रंगाच्या छटा निवडता येतात.

### ओठांवर रेषा किंवा पोत असल्यास मॅट लिपस्टिक कशी लावावी?

ओठांवर बारीक रेषा किंवा पोत अधिक असल्यास कोरडी किंवा अतिशय मॅट लिपस्टिक वापरणे टाळावे. त्यामुळे ओठांवरील रेषा अधिक ठळक दिसू शकतात. सर्वप्रथम ओठांवर लिप बाम लावा. काही वेळाने अतिरिक्त बाम टिश्यूने पुसून टाका आणि त्यानंतर लिपस्टिकचा पातळ थर लावा. गरज असल्यासच दुसरा थर लावा. अशा ओठांवर लिपस्टिक वारंवार घासून लावणे टाळा. त्यामुळे रंग बारीक रेषांमध्ये अधिक साचू शकतो. सहजपणे ओठांवर पसरता येईल अशी लिपस्टिक निवडा. लिक्विड लिपस्टिक वापरणार असाल तर ती सुकल्यानंतर ओठांना खूप कोरडेपणा जाणवणार नाही, याची काळजी घ्या. सॅटिन किंवा सॉफ्ट-मॅट प्रकारच्या लिपस्टिकही पर्याय म्हणून वापरता येतात.



### लिपस्टिकचा रंग का बदलतो?

नैसर्गिक रंगाचे ओठ आणि अधिक पिगमेंटेड म्हणजेच गडद रंगाचे ओठ यांच्यावर एकाच लिपस्टिकचा रंग वेगवेगळा दिसू शकतो. पिगमेंटेड ओठांवर लिपस्टिकचा मूळ रंग तसाच दिसेलच असे नाही. अशा वेळी मेकअप करताना ओठांवर कन्सीलरचा अतिशय पातळ बेस देता येतो. पूर्ण मेकअप करत नसल्यास लिपस्टिक लावण्यापूर्वी न्यूड रंगाची लिपस्टिकही वापरता येते. तिचा थर मात्र अतिशय पातळ असावा. जास्त थर लावल्यास लिपस्टिक असमान किंवा पॅची दिसू शकते. न्यूड लिपस्टिक लिपलाइनर लावल्यानंतर लावा आणि ती पूर्णपणे सुकू द्या. त्यानंतर आपल्या आवडीच्या रंगाची लिपस्टिक त्यावर लावा. यामुळे लिपस्टिकचा रंग अधिक समान दिसण्यास मदत होऊ शकते आणि ती अधिक काळ टिकू शकते.

### मगच निवडा लिपस्टिक...

लिपस्टिक लावण्याची एकच पद्धत प्रत्येकासाठी योग्य ठरत नाही. ओठांचा आकार, नैसर्गिक रंग आणि पोत यानुसार लिपलाइनर, लिपस्टिकचा प्रकार आणि तिची फिनिश निवडणे महत्त्वाचे आहे. योग्य तंत्राचा वापर केल्यास साधी लिपस्टिकही ओठांना अधिक सुबक, संतुलित आणि आकर्षक लुक देऊ शकते.

# पती-पत्नीमध्ये कधीच भांडण नसेल, तर काहीतरी अपूर्ण... नवविवाहितांना सल्ला


**इन्फोसिस फाउंडेशनच्या माजी अध्यक्षा आणि समाजसेविका सुधा मूर्ती यांनी वैवाहिक नात्याबाबत महत्त्वाचा सल्ला दिला आहे. त्यांच्या मते, पती-पत्नीमध्ये कधीच वाद किंवा भांडण होत नसेल तर ही बाब नेहमीच चांगली असते असे नाही. वैवाहिक नात्यात मतभेद होणे स्वाभाविक आहे; मात्र त्या मतभेदांना दोघे कशा पद्धतीने सामोरे जातात, हे अधिक महत्त्वाचे आहे. सुधा मूर्ती यांनी तरुण जोडप्यांना सल्ला देताना सांगितले की, रागाच्या क्षणी शांत राहणे, एकमेकांना स्वीकारणे आणि घरातील जबाबदाऱ्या परस्पर सहकार्याने पार पाडणे यामुळे वैवाहिक नाते अधिक दृढ होते.**



» छोट्या गोष्टींचे मोठ्या वादात रूपांतर होऊ देऊ नका : सुधा मूर्ती यांच्या मते, प्रत्येक गोष्टीला त्याच क्षणी उत्तर देणे आवश्यक नसते. काही वेळा थोडे थांबणे हाच योग्य निर्णय ठरू शकतो. एखाद्या दिवशी मनःस्थिती ठीक नसेल, तर जोडीदाराला थोडा वेळ आणि अवकाश देणे नात्यासाठी फायदेशीर ठरते. वैवाहिक जीवनात प्रत्येक वाद जिंकणे आवश्यक नाही. काही वेळा एकमेकांना समजून घेणे, एखादी गोष्ट सोडून देणे आणि नंतर शांतपणे व प्रेमाने संवाद साधणे अधिक महत्त्वाचे ठरते. परस्पर समजूतदारपणा, संयम आणि सहकार्य यामुळेच वैवाहिक नाते दीर्घकाळ टिकून राहण्यास मदत होते.

» प्रत्येक विवाहाची कहाणी वेगळी : प्रत्येक वैवाहिक जीवनाची कहाणी सारखी नसते. कुठे हास्य-विनोद असतो, कुठे छोट्या-मोठ्या कुरबुरी असतात, तर कुठे क्षुल्लक कारणांवरून वादही होतात. मात्र पती- पत्नीमध्ये कधीच भांडण झाले नाही, असे नाते सुखी असल्याचे लक्षण आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो. याबाबत सुधा मूर्ती यांनी वेगळा दृष्टिकोन मांडला आहे. त्यांच्या मते, एखादे जोडपे 'आमच्यात कधीच भांडण झाले नाही' असे सांगत असेल, तर त्यांच्या नात्यात काहीतरी अपूर्ण असण्याची शक्यता आहे. विवाहात मतभेद होणे चुकीचे नाही. महत्त्वाचे म्हणजे त्या वादानंतर दोघे एकमेकांशी कसे वागतात आणि नाते कसे सांभाळतात...

» मतभेद होणे अगदी स्वाभाविक : सुधा मूर्ती यांच्या मते, विवाह म्हणजे दोन वेगवेगळ्या व्यक्तींचे सहजीवन. त्यामुळे प्रत्येक विषयावर दोघांचे मत एकसारखे असेलच असे नाही. छोट्या-छोट्या मुद्द्यांवर मतभेद किंवा चर्चा होणे ही सामान्य बाब आहे. मात्र प्रत्येक वादाचे मोठ्या भांडणात रूपांतर होणे योग्य नाही. अनेकदा समोरच्या व्यक्तीचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, काही काळ थांबणे किंवा जोडीदाराला थोडा वेळ देणे यामुळे परिस्थिती बिघडण्यापासून वाचू शकते. वाद कसा संपवला जातो, यातच नात्याची खरी ताकद दिसून येते.



» दोघांनी एकाच वेळी रागावू नये... : सुधा मूर्ती यांनी त्यांच्या वैवाहिक जीवनाचे उदाहरणही दिले आहे. त्यांचे पती एन. आर. नारायण मूर्ती रागावलेले असतील, तर त्या त्याच वेळी त्यांच्याशी वाद घालत नाहीत. त्याचप्रमाणे त्या नाराज असताना नारायण मूर्ती शांत राहण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या मते, पती-पत्नी दोघेही एकाच वेळी रागाच्या भरात आपले म्हणणे सिद्ध करण्याचा प्रयत्न करू लागले, तर छोटासा मुद्दाही मोठ्या भांडणाचे कारण बनू शकतो. त्यामुळे आधी मन शांत करणे आणि त्यानंतर विषयावर चर्चा करणे हा अधिक योग्य मार्ग आहे.

» जोडीदाराला बदलण्याचा प्रयत्न करू नका... : सुधा मूर्ती यांच्या मते, जगात कोणताही पती किंवा पत्नी परिपूर्ण नसतो. प्रत्येक व्यक्तीमध्ये काही गुण असतात, तर काही उणिवाही असतात. त्यामुळे विवाहाचा अर्थ समोरच्या व्यक्तीला आपल्या अपेक्षेनुसार बदलणे नव्हे, तर त्याला त्याच्या गुण-दोषांसह स्वीकारणे हा आहे. जोडीदाराची इतरांशी तुलना करणेही टाळायला हवे. उदाहरणार्थ, पत्नीने आईप्रमाणे स्वयंपाक करावा, अशी अपेक्षा करणे योग्य नाही. आई आणि पत्नी यांच्या जीवनातील परिस्थिती, जबाबदाऱ्या आणि भूमिका वेगवेगळ्या असतात. अशा प्रकारच्या तुलनांमुळे नात्यात अनावश्यक दुरावा निर्माण होऊ शकतो.

» घरातील जबाबदाऱ्या दोघांनी मिळून पार पाडाव्यात : पती-पत्नी दोघेही नोकरी करत असतील, तर घरातील जबाबदाऱ्याही दोघांनी मिळून पार पाडायला हव्यात, असे सुधा मूर्ती यांनी म्हटले आहे. स्वयंपाक करणे, मुलांची काळजी घेणे, घरातील कामे करणे आणि कुटुंबाची जबाबदारी सांभाळणे हे केवळ एका व्यक्तीचे कर्तव्य असू नये. एकमेकांना मदत करणे, काही गोष्टींकडे दुर्लक्ष करणे आणि जबाबदाऱ्या वाटून घेणे यामुळे वैवाहिक नाते अधिक मजबूत होण्यास मदत होते.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

**गोदातीर समाचार**

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# श्री विसर्जनासाठी कृत्रिम तलाव, खदानीत सोय




**नांदेड (प्रतिनिधी)–** लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने तयारी केली असून, यंत्रसामग्री आणि मनुष्यबळाचे नियोजन केले आहे. उद्या शुक्रवार, दिनांक २५ सप्टेंबर २०२६ रोजी श्री गणेश मूर्तींचे विसर्जन होणार आहे.

महानगरपालिकेच्या अधिकृत आकडेवारीनुसार गतवर्षी तिन्ही कृत्रिम तलाव व दोन्ही खदान येथे गणेश मंडळांचे ८१४ व घरगुती ४३,६६४ असे दोन्ही मिळून एकूण ४४,४७८ गणेश मूर्तींचे विसर्जन झाले होते. यंदा नांदेड शहरात लहान-मोठे मिळून सार्वजनिक गणेश मंडळांनी ४४४ गणेश मूर्तींची स्थापना केली असून, विसर्जन सोहळा सुरक्षित, सुव्यवस्थित आणि पर्यावरणपूरक पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासनाने व्यवस्था केली आहे.

महापालिका प्रशासनाने विसर्जन व्यवस्थेसाठी विविध घाटांवर एकूण २५ क्रेन आणि १२६ तराफे तैनात केले आहेत. त्याचप्रमाणे शहराच्या विविध भागात १७ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्रे आणि ५ कृत्रिम टब तयार करण्यात आले आहेत. नागरिकांकडून मूर्ती व निर्माल्य संकलनासाठी ३५ गणेश मूर्ती संकलन वाहने आणि १० निर्माल्य संकलन वाहने नियुक्त करण्यात आली आहेत. श्री मूर्तींची उंची व आकार विचारात घेऊन ६ फूट उंचीपर्यंतच्या मूर्तींसाठी पासदगाव, सांगवी आणि नावघाट येथे कृत्रिम तलाव तयार केले आहेत. तर ६ ते १२ फूट उंचीच्या मोठ्या मूर्तींसाठी दक्षिण नांदेडमध्ये किवळा साठवण तलाव आणि उत्तर नांदेडमध्ये येळेगाव खदान सज्ज करण्यात आली असून विसर्जन घाटांवर कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी ६०० जीवरक्षक तैनात करण्यात आले आहेत.

विसर्जन काळात आणि त्यानंतर शहर व घाट परिसराच्या स्वच्छतेसाठी मनपाच्या एकूण १,०२३ सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, गोदावरी व आसना नदीच्या विविध घाटांवर नागरिकांकडून गणेश मूर्ती व निर्माल्य संकलनासाठी दोन सत्रात पालिकेच्या वर्ग-३ व वर्ग-४ च्या एकूण १,२२३ कर्मचाऱ्यांची विशेष नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे स्वच्छतेचे काम युद्धपातळीवर करण्यासाठी १०० घंटागाड्या, २० टेम्पो, २ जेसीबी, १ आरसी आणि ५ अत्याधुनिक स्विपींग मशीन्स तैनात करण्यात आल्या असून महापालिका प्रशासनाने सर्व विसर्जन स्थळांवर सुरक्षा, पुरेशी प्रकाश व्यवस्था आणि आवश्यक आरोग्य पथके नियुक्त केली आहेत.

### नदी प्रदूषण टाळण्यासाठी कृत्रिम तलावांचा वापर करुन मोठ्या मूर्तींचे प्रतिकात्मक विसर्जन करा

लाडक्या बाप्पाचा विसर्जन सोहळा हा अत्यंत जिव्हाळ्याचा आणि आनंदाचा सण आहे. हा आनंद द्विगुणीत करताना सर्व गणेशभक्तांनी आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाला संपूर्ण सहकार्य करावे. गोदावरी व आसना नदीचे प्रदूषण टाळण्यासाठी नागरिकांनी प्रशासनाने उभारलेल्या मूर्ती संकलन केंद्रांचा, कृत्रिम टब आणि कृत्रिम तलावांचा जास्तीत जास्त वापर करून मोठ्या मूर्तींचे प्रतिकात्मक विसर्जन करावे. निर्माल्य नदीपात्रात न टाकता ते मनपाच्या निर्माल्य वाहनांकडेच सुपूर्द करावे. शिस्त, शांतता आणि पर्यावरणपूरक नियमांचे पालन करून आपल्या लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप द्यावा.

**–डॉ. महेशकुमार डोईफोडे,**
**आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका**

## अवैध रेती उपसा करणाऱ्या माफियांवर कारवाई; ४४ लाख ६६ हजारांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध घालण्यासाठी नांदेडचे जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सुरू असलेल्या विशेष मोहिमे दरम्यान गोदावरी नदीपात्रातून बेकायदेशीररीत्या वाळू (रेती) उपसा करणाऱ्या वाळू माफियांविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलिसांनी महसूल विभागाच्या सहकार्याने मोठी कारवाई केली आहे.

वाहेगाव व मार्कंड शिवारातील गोदावरी नदीपात्रात टाकलेल्या या छाप्यात सुमारे ४४ लाख ६६ हजार रुपयांची साधनसामग्री जप्त करून जागीच नष्ट करण्यात आली आहे. या प्रकरणी एकूण सहा जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मंगळवार, दि. २२ सप्टेंबर रोजी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या आदेशानुसार गुन्हे शोध पथकाचे पोलीस पथक हद्दीत अवैध धंद्यांची माहिती काढण्यासाठी गस्त घालत होते. गस्तीदरम्यान वाजेगाव हद्दीत गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, सिद्धू बालीसिंग महाराज हा इसम आपल्या मजुरांच्या मदतीने मार्कंड व वाहेगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रात बोटी, तराफे व इंजिनच्या साहाय्याने अवैधरीत्या मोठ्या प्रमाणावर रेती उपसा करत आहे.

## शिवरोडवर पहाटे पोलिसांचा छापा; 'तिर्रट' जुगार खेळणारे ६ जण ताब्यात



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील शिवरोड परिसरात भररस्त्यात सुरू असलेल्या 'तिर्रट' जुगारावर भाग्यनगर पोलिसांनी बुधवार, दि. २३ सप्टेंबरच्या पहाटे धाड टाकली. या कारवाईत ६ जुगाऱ्यांना रंगेहात ताब्यात घेऊन ३ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने भाग्यनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी आपल्या गुन्हे शोध पथकाला पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांविरुद्ध विशेष मोहीम राबवून गुन्हेगारांना अटक करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर गुन्हे शोध पथक पेट्रोलिंग करत असताना संकेतनगर पाटीजवळ सार्वजनिक रस्त्यावर लाईटच्या उजेडात जुगार सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी दोन पंचांसमक्ष छापा टाकला असता ६ जण पैशांची बाजी लावून जुगार खेळताना आढळले.

या कारवाईत दीपक सुभाष येवतीकर (वय ३०, निलेश्वरी कॉलनी), विनोद किशनराव खांडरे (वय ३९, स्वस्तिकनगर), ओंकार बालाजी बैनवाड (वय २७, मंत्रीनगर), सचिन अशोक नागरगोजे (वय ४५, निलेश्वरी कॉलनी), शशांक लक्ष्मण गबाळे (वय २४, निलेश्वरी कॉलनी) आणि विनायक मधुकर मिरकुटे (वय २६, खंडोबा चौक, नांदेड) यांना ताब्यात घेतले आहेत.

## एसपींच्या प्रस्तावावर एसडीएमचा आदेश; शहरातील १२ सराईत गुन्हेगार ४ महिन्यांसाठी हद्दपार

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** आगामी सण- उत्सव काळात शहरात शांतता व कायदा सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी नांदेड पोलिसांनी गुन्हेगारांविरुद्ध कडक मोहीम हाती घेतली आहे. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या '२+ स्कीम' अंतर्गत दोन किंवा अधिक गंभीर गुन्हे असलेल्या सराईत गुन्हेगारांवर कारवाई करण्यात येत आहे.

पोलीस अधीक्षकांनी सादर केलेल्या प्रस्तावावर उपविभागीय दंडाधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६(१)(ब) अन्वये १२ गुन्हेगारांना ४ महिन्यांसाठी हद्दपार करण्याचे आदेश दि. २२ सप्टेंबर रोजी दिले आहेत. शिवाजीनगर (३), वजिराबाद (३), भाग्यनगर (१) आणि नांदेड ग्रामीण (५) पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील हे गुन्हेगार घातक शस्त्रे बाळगून दहशत माजवणे, जबरी चोरी, खंडणी आणि खुनाचा प्रयत्न यासारख्या गुन्ह्यांत सक्रिय होते.

हद्दपार केलेल्यांचा तपशील - वैभव महेंद्र सुर्यतळे (वय २२) भाग्यनगर नांदेड, परभणी, हिंगोली, यश उर्फ पिल्लू जोंधळे (वय २३) शिवाजीनगर नांदेड, परभणी, हिंगोली, सुबोध सुनील गजभारे (वय २५) शिवाजीनगर नांदेड जिल्हा, प्रशीक मिलिंद केळकर (वय २१) शिवाजीनगर नांदेड जिल्हा, श्रीनिवास उर्फ आदू जाधव (वय १९) वजिराबाद नांदेड जिल्हा, प्रेमज्योतसिंग उर्फ सोनू तोपजी (वय ३५) वजिराबाद नांदेड जिल्हा, सुरज उर्फ सुरज्या हाटकर (वय २६) वजिराबाद नांदेड जिल्हा, आकाश रमेश शितळे (वय २०) नांदेड ग्रामीण नांदेड जिल्हा, शुभम दत्ता सुनेवाड (वय २३) नांदेड ग्रामीण नांदेड जिल्हा, रणज्योतसिंग उर्फ बच्चू बावरी (वय २०) नांदेड ग्रामीण नांदेड जिल्हा, सय्यद सलमान उर्फ भुऱ्या (वय २५) नांदेड ग्रामीण नांदेड जिल्हा, अविनाश सोम भारती (वय २५) नांदेड ग्रामीण नांदेड जिल्हा आदींवर कारवाई करण्यात आली.

## नगरसेवकाच्या कारच्या धडकेत दोन वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू

**नांदेड (प्रतिनिधी)–** कंधार शहरातील हताईपुरा परिसरात भरधाव कारच्या धडकेत दोन वर्षीय चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी राजकीय दबावामुळे गुन्हा दाखल होत नसल्याचा आरोप मयत बालकाच्या पालकांनी केला आहे. या घटनेनंतर कंधार शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्राप्त माहितीनुसार हताईपुरा येथील रहिवासी कोयल ढवळे यांचा दोन वर्षीय मुलगा मंगळवारी दुपारी घरासमोर खेळत असताना भरधाव कारने त्याला धडक दिली. या अपघातात तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने कंधार ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार माजी उपनगराध्यक्ष जफर उल्ला खान यांच्या ताब्यातील असल्याचे सांगितले जात आहे. घटनेनंतर पालकांनी पोलीस ठाण्यात धाव घेत टाहो फोडला, मात्र पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप आहे. पोस्टमॉर्टेमनंतरही गुन्हा दाखल न झाल्याने पालकांनी मृतदेहासह पोलीस ठाण्यात ठिय्या मांडला होता. समाजबांधवांच्या विनंतीनंतर अंत्यसंस्कार करण्यात आले.

आज मयत बालकाच्या आई-वडिलांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात जाऊन तक्रार दिली असून, त्यांना केवळ आश्वासन देऊन परत पाठवण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

## युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**उमरी (प्रतिनिधी)** –उमरी येथे एका युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. सदरची घटना दि. २३ सप्टेंबर रोजी सकाळी उघडकीस आली.

उमरी रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या लिंबाच्या झाडाला शिवचरण चंपतराव पाटील रा. सोनारी ता. भोकर, जि. नांदेड वय २५ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच उमरी पोलिसांनी पंचनामा करुन प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. उमरी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली.

## नागोराव वारे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** –मुखेड तालुक्यातील सांगवी (बे) येथील प्रतिष्ठित नागरिक नागोराव हावन्ना वारे यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार माधव वारे यांचे ते वडील होत. त्यांच्या निधनाबद्दल आ. डॉ. तुषार राठोड, माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, माजी सरपंच महेंद्र देशमुख, माजी जि. प. सदस्य हणमंतराव मस्कले, गजानन पत्की, उमाकांत मस्कले, सरपंच मिलिंद जोंधळे, डॉ. पत्की आदींसह अनेकांनी दुःख व्यक्त केले.

## रघुनाथ लोणे यांचे निधन



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** डोंगरकडा सहकारी साखर कारखान्याचे सेवानिवृत्त शेतकी अधिकारी, लहान येथील ज्येष्ठ नागरिक रघुनाथ केरबाजी लोणे (वय ७५) यांचे बुधवार, दि.२३ रोजी नांदेड येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना वृद्धापकाळामुळे निधन झाले.

त्यांच्या पार्थिव देहावर गुरवार, दि. २४ रोजी स. ११ वा. लहान येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण विभाग, मुंबई येथील क्षेत्रीय अधिकारी प्रमोद लोणे लहानकर यांचे ते वडील होत.

## दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी मुदखेड, माहूर, भोकरमध्ये काँग्रेसचे घंटानाद आंदोलन

**नांदेड (प्रतिनिधी)** –यावर्षी पावसाने दगा दिल्यामुळे नांदेड जिल्ह्यासह राज्यात पावसाची तूट निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळ जाहीर करावा या मागणीसाठी नांदेड जिल्ह्यातील मुदखेड, माहूर, भोकरमध्ये काँग्रेसकडून घंटानाद आंदोलन करण्यात आले आहे.

मुदखेड तालुक्यात यावर्षी पावसाअभावी शेतकऱ्यांची खरीप पिके होरपळून गेली असून, कोरडा दुष्काळ जाहीर करण्याच्या प्रमुख मागणीसाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी घंटानाद आंदोलन करण्यात आले. शेतकऱ्यांना एकरी ५० हजार रुपये अनुदान तत्काळ देण्याचे लेखी निवेदन तहसील प्रशासनाला देण्यात आले आहे.

यावर्षी गेल्या दोन महिन्यांपासून पाऊसच पडला नसल्याने शेतातील खरीप पिके अक्षरशः करपली आहेत. लागवड खर्चही निघणार नसल्याने शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला आहे. परंतु याबाबत शासन कोरड्या दुष्काळासंदर्भात कोणतेही ठोस पाऊल उचलत नसल्याने शेतकरी हतबल झाला आहे. जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने बुधवार, दि. २३ रोजी जिल्ह्यातील विविध तालुक्यात घंटानाद आंदोलन करण्याचा निर्णय घेतला होता. या अनुषंगाने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी लोकसभा खासदार प्रा. रवींद्र पाटील चव्हाण यांच्या आदेशान्वये तसेच काँग्रेसचे उत्तर जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालयात काँग्रेसच्या पदाधिकारी व शेतकऱ्यांनी लक्षवेधी आंदोलन केले आहे.

मराठवाड्यासह नांदेड जिल्ह्यातील माहूर तालुक्यात भीषण टंचाई निर्माण झाली असून, हा संपूर्ण भाग तातडीने 'कोरडा दुष्काळ' म्हणून जाहीर करण्यात यावा, अशी मागणी माहूर तालुका व शहर काँग्रेस पक्षाने माहूर तहसीलदारांमार्फत राज्य सरकारकडे केली आहे.

मराठवाड्यात आणि विशेषतः माहूर परिसरात पावसाने प्रदीर्घ खंड दिल्याने सोयाबीन, कापूस, ज्वारी यांसारखी खरिपाची पिके पूर्णपणे करपून गेली आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना प्रति एकरी १ लाख रुपयांची आर्थिक मदत तत्काळ मिळावी आणि संपूर्ण कर्जमाफी व्हावी यासाठी माहूर तालुका काँग्रेस पक्षाकडून निवेदन देऊन आंदोलन करण्यात आले आहे.

संपूर्ण मराठवाडा आणि विशेषतः माहूर तालुका दुष्काळग्रस्त घोषित करण्यात यावा, एकरी १ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी, पिकांच्या १००% नुकसानीची भरपाई म्हणून शेतकऱ्यांना तातडीने भरीव एकरी मदत द्यावी यासह अन्य काही महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या आदेशानुसार भोकर तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने भोकर येथे दि. २३ सप्टेंबर रोजी घंटानाद आंदोलन करण्यात आले. यावेळी शासनाचे लक्ष मराठवाड्यातील दुष्काळसदृश परिस्थितीकडे वेधत मराठवाड्यात तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करावा आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना एकरी ५० हजार रुपये आर्थिक

## गणेश दर्शन



श्री अष्टविनायक गणेश मंडळ, बालाजी मंदिर पारसनगर, नांदेड



श्री दयानंद बाल गणेश मंडळ, दयानंद नगर, नांदेड



व्यापारी असोसिएशन गणेश मंडळ, नवा मोंढा, नांदेड



श्री अष्टविनायक गणेश मंडळ, गोकुळ नगर नांदेड



ज्येष्ठ नागरीक गणेशोत्सव मंडळ, विष्णूनगर (छाया : नरेंद्र गडप्पा)

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com